
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालि. वा.
दा. क्र. ५४८९

IRBK-0105489

IRBK-0105489

# जवाहरलालची कहाणी

५४८७



शकुंतला मेहता


IRBK-0105489

IRBK-0105489

कुमकुमला सांगितलेली

# जवाहरलालची कहाणी

लेखिका व चित्रकर्ती: शकुंतला मसानी. अनुवादक: वि. स. सुखठणकर.



ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस १९५६

# JAWAHARLALCHI KAHANI

Marathi Translation of

*The Story of Jawaharlal*

By Shakuntala Masani

Translated by V. S. Sukhthankar

First Published 1956 प्रथमावृत्ति १९५६

Printed by J. D. Desai, at Rashtra Vaibhav Press, 273, Vithalbhai Patel Road, Girgaon, Bombay 4 and Published by Geoffrey Cumberlege, Oxford University Press, Bombay, 1


# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | कोणे एके काळीं | १ |
| २. | जवाहर घोड्यावरून पडतो | १५ |
| ३. | जवाहरचें जगपर्यटण | २४ |
| ४. | परत घरीं | ३१ |
| ५. | कमला आणि काश्मिर | ३८ |
| ६. | वाईटांतून बरें निघालें | ४४ |
| ७. | तुरुंगवासाचा पहिला अनुभव | ४९ |
| ८. | कॉंग्रेसचा अध्यक्ष | ५५ |
| ९. | हिमालयाच्या पायथ्याशीं | ६८ |
| १०. | एक दुःखाचा दिवस | ७८ |
| ११. | कठीण दिवस | ८४ |
| १२. | अहमदनगरची एक बाग | ९१ |
| १३. | ‘ चलो दिल्ली ’ | ९७ |


२०५२३

# १. कोणे एके काळीं


कुमकुम, तुला दाखवण्याकरतां हिंदुस्थानचा नकाशा मी काढला, तर साधारणपणें त्याची आकृति अशी असेल.



उजव्या बाजूला जवळजवळ माथ्यावर मी एक टिंब दाखवलें आहे. तें टिंब पाहून तूं बुचकळ्यांत पडशील. अलाहाबाद नांवाचें एक स्थळ आहे, तें दाखवण्याकरतां हें टिंब दिलेलें आहे. अलाहाबाद या शब्दाचा अर्थ 'ईश्वराचें स्थान' असा आहे. हें शहर फारसें मोठें नाहीं. विस्तारानें तें कलकत्ता किंवा मुंबई या शहरांच्या जवळपास सुद्धां येणार नाहीं तरीपण या दोन्ही शहरांइतकेंच हें अलाहाबाद शहरही महत्त्वाचें आहे. तुझें मन, कुमकुम, चुळबुळ करूं लागलेलें दिसतें. मी तुला जी एक गोष्ट सांगण्याचें




माझ्या गोष्टीची सुरवात करणार आहे, ती त्याच्या लहानपणापासून नव्हे. त्याच्या जन्माच्याही मागच्या, फार मागच्या काळा-मध्यें तुला नेऊन, बरं का कुमकुम, मी या माझ्या गोष्टीचा आरंभ करणार आहे व सर्व गोष्टीं प्रमाणेंच माझी ही गोष्ट सुरू करावयाची म्हणजे–



कोणे एकेकाळीं, फार जुन्या-काळीं–इतक्या जुन्या काळीं कीं, जेव्हां तुझ्या पणजोबांचे पणजोबा वयानें तुझ्या एवढे लहान होते, तेव्हां–उंच हिमालय पर्वतामध्यें एक घरंदाज ब्राह्मण कुटुंब राहात असे. भव्य

डोंगरांमध्यें वसलेल्या ज्या देशामध्यें हें कुटुंब राही, त्या देशाचें नांव काश्मिर असें आहे. थोड्यावेळापूर्वीं मी तुला जसा एक नकाशा काढून दाखवला तसाच आणखी एक नकाशा मला काढला पाहिजे. म्हणजे हा काश्मिरचा प्रदेश कुठें आहे, हें तुला माहित नसल्यास, या नकाशावरून तुला तें कळेल. या खेपेला या दुसऱ्या नकाशामध्यें डावीकडे अगदीं उत्तरेला, मी जेथें डोंगरांची आकृति काढली आहे, त्या ठिकाणींच हे उंच, बर्फमय माथ्याचे असे काश्मिरचे डोंगर आहेत.




जिकडे तिकडे सुंदर फुलें व रसाळ

फळें, अशा या डोंगरी प्रदेशामध्यें राहाणाऱ्या या कुटुंबांतलीं माणसेंही उंच, गोरीं व सुस्वरूप अशीं होतीं. चोहोंबाजूला पसरलेल्या निसर्गसौंदर्यामध्यें राहाण्याचें सुख प्राप्त झालें असूनही हें कुटुंब येथें फार काळ राहिलें नाहीं. हा आपला समृद्ध प्रदेश सोडून त्या उंच पर्वतांच्या पायथ्याशीं असलेल्या सखल भागांत तें आलें. नंतर उत्तरेंतील अफाट माळप्रदेशांतून प्रवास करीत करीत, मोंगलबादशहाची वैभवशाली राजधानी जें दिल्ली शहर तेथें तें येऊन पोंहोंचलें. आगगाड्या, मोटारी, विमानें असलेल्या सध्यांच्या या दिवसांतसुद्धां, कुमकुम विचार कर, हा प्रवास किती दूरचा आहे! मग तो जुनाकाळ लक्ष्यांत घेतां हा प्रवास कितीतरी अधिक लांबचा म्हटला पाहिजे. कारण त्या काळीं हत्ती, घोडे, उंट यांच्या पाठीवरून किंवा ज्यांच्याकडे हीं जनावरें नसतील, त्यांना पायींही मजल मारावी लागे.

अशा रीतीनें हे लोक दिल्लीला येऊन पोहोंचल्यावर त्यांनीं या शहरांत राहाण्याचें ठरवलें. मोंगलबादशहाच्या दरबारांत ते नोकरी करूं लागल्यामुळें बादशहानें त्यांना एका 'नाहरा'च्या–ओढ्याच्या तीरावर असलेलें एक घर राहाण्याकरतां दिलें. खरें पाहिलें असतां या काश्मिरी कुटुंबांतील माणसांचें मूळचें आडनांव 'कौल' असें होतें. पण या नाहराजवळ ते राहूं लागल्यामुळें लवकरच 'नेहरू' या नांवानें ते ओळखले जाऊं लागले.


या दिल्ली शहरांतही नेहरूंना कायमचें वास्तव्य करतां आलें नाहीं. १८५७ सालीं जेव्हां या आपल्या देशांतील लोकांनीं ब्रिटिश सत्तेविरुद्ध एक मोठें बंड पुकारलें, तेव्हां बऱ्याच लोकांना दिल्ली शहर सोडून पळून जावें लागलें. नेहरूंनाही यावेळीं आग्रा शहराला



पळून जाणें भाग पडलें. आग्र्यामध्यें कांहीं वर्षें राहिल्यावर जेथें यमुनेचें स्वच्छ, निळें पाणी गंगा नदीच्या गढूळ प्रवाहाला येऊन मिळतें, तेथें वसलेल्या अलाहाबाद शहरामध्यें ते आलें व या शहरामध्यें अखेरीस ते स्थायिक झाले. त्यांचीं मुलें येथें लहानाचीं मोठीं झालीं व त्यांनाही येथें मुलें झालीं. अशा रीतीनें किती तरी वर्षें त्यांनीं या शहरामध्यें सुखासमाधानानें वास्तव्य केलें. त्यांच्याबाबतींत विशेष सांगण्यासारखें असें कांहीं १८८९ सालापर्यंत घडून आलें नव्हतें. पण या वर्षीं नोव्हेंबर महिन्यांत एक महत्त्वाची गोष्ट घडली, ती म्हणजे मोतिलाल नेहरूंना एक मुलगा झाला, ही होय. हिंदुस्थानांतील कुठल्याही कुटुंबांत पुत्रजन्म ज्या प्रकारें साजरा होतो, तसाच नेहरू कुटुंबांतही हा दिवस मोठ्या आनंदोत्सवानें साजरा झाला. हा मुलगा वाढूं लागला. तो वर्णानें गोरा व सशक्त होता व पाहतांक्षणींच कोणाचेंही त्याच्यावर प्रेम जडे. ‘जवाहर’ असें त्याचें नांव ठेवण्यांत आलें. कारण हें मूल म्हणजे त्या घरचें एक बहुमोल रत्नच होतें.

# २. जवाहर घोड्यावरून पडतो

जवाहरचें आपली आई व वडिल यांच्यावर फार प्रेम होतें. पण आपल्या वडिलांची त्याला फार भीति वाटे. कारण मोतिलाल हे फार रागीट स्वभावाचे होते. त्यांना एकदांका राग आला कीं, ते मग एवढे खवळून जात कीं, त्यावेळीं सर्वांची घाबरगुंडी उडे.




एकदां जवाहर पांच वर्षांचा असतांना त्यानें अशी एक गोष्ट केली कीं, त्यामुळें त्याचे वडील त्याच्यावर फार रागावले. मोतिलालकडे दोन फाउंटनपेनें होतीं. त्याकाळीं फाउंटनपेन ही फार दुर्मिळ अशी वस्तू असे. त्यामुळें या फाउंटनपेनांना ते फार जपत असत. पण जवाहरलासुद्धां हीं पेनें फार आवडत व त्यांतलें एक स्वतःला मिळावें, असें त्यास वाटे. एक दिवस हीं दोन्ही पेनें मोतिलालच्या टेबलावर असलेलीं त्याला दिसलीं. "वडिलांना या दोन्ही पेनांची काय एवढी जरूर आहे?" असा विचार मनांत येऊन त्यानें त्यांतलें एक स्वतःकरतां घेतलें. कांहीं वेळानें टेबलावरचें एक पेन नाहींसें झालेलें मोतिलालना दिसून आलें व लगेच त्याचा घरभर शोध सुरू झाला. जवाहर यावेळीं इतका घाबरून गेला कीं, तें पेन आपण घेतलें आहे, असें कबूल करण्याचा त्याला धीर होईना. त्यामुळें त्यानें हें पेन लपवून ठेवलें. पण ही गोष्ट लवकरच उघडकीला आली. मोतिलाल यावेळीं आपल्या मुलावर एवढे संतापले कीं, रागाच्या भरांत त्यांनीं जवाहरला चांगलाच मार दिला. त्यांच्या हातांतून सुटका होतांच जवाहरनें आपल्या आईजवळ धांव घेतली. त्याची आई फार मृदू अंतःकरणाची होती. तिनें प्रेमानें यावेळीं त्याला जवळ घेतलें व त्याचें सांत्वन केलें.

आपल्या वडिलांप्रमाणेंच जवाहरचा स्वभावही फार तापट आहे. आतां त्याच्या या मोठ्या वयांत व तो एवढ्या थोर पदाला चढलेला असतांनासुद्धां एखाद्या जाहिर समारंभामध्यें किंवा एखाद्या सभेमध्यें लोकांनीं अयोग्य वर्तन केलें किंवा एखादी चूक केली कीं, त्याचा

हा रागीटपणा दिसून येतो. अशा प्रसंगीं त्याच्या वडिलांइतकाच त्याचाही राग भयंकर असल्याचा अनुभव आल्यावांचून राहात नाहीं.

हळुहळू जवाहरचा लेंकुरपणा संपून तो एक मोठा मुलगा झाला. ज्यांच्याबरोबर त्याला खेळतां येईल, अशीं त्याच्या वयाचीं मुलें त्याच्या घरीं नव्हतीं. त्यामुळें कित्येकदां त्याला या एकटेपणाचा कंटाळा येई व तो उदास होई. त्याचे चुलतभाऊ त्याच्याहून वयानें कितीतरी मोठे होते. पण पुष्कळदां तो त्यांच्यामध्यें जाऊन बसे व



२०५२३

मोठ्या माणसांचे बोलण्याचे जे विषय असतात, अशा विषयांवर त्यांचें चालणारें बोलणें ऐके. सध्यां आपलेच लोक आपल्या या देशाचा राज्यकारभार चालवतात. पण त्याकाळीं आपल्या लोकांऐवजीं इंग्लडचे लोक येथें राज्य करीत, यासंबंधीं आपल्या या चुलतभावांचें चाललेलें बोलणें ऐकलें, म्हणजे त्या लहान वयांतसुद्धां, हिंदुस्थानवर परकी लोक सत्ता चालवतात व आपले लोक स्वतंत्र नाहींत, याबद्दल जवाहरचें मन खिन्न होई.




आपल्या आईखेरीज, ज्याची संगत जवाहरला आवडे, असें त्याच्या प्रीतींतलें आणखी एक माणूस म्हणजे म्हातारे मुनशीजी. या मुनशीजीना भली मोठी पांढरी दाढी होती व ते ज्ञानानें फार मोठे व फार वयस्कर असले पाहिजेत असें पाहाणाऱ्याला वाटे. जवाहर तर या जगांत सर्वांत जास्त बुद्धिमान् व वयानें सर्वांत मोठा असा कोणी मनुष्य असेल, तर

हे आपले मुनशीजी, असें मानी. या मुनशीजींच्या मांडीवर वसून तासचेतास त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी तो ऐकत राही. १८५७ सालच्या बंडामध्यें आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरतां येथले लोक किती शौर्यानें लढले, असल्या गोष्टी त्यांच्या तोंडून ऐकल्या, म्हणजे आपल्या शूर देशबांधवांच्या अभिमानानें जवाहरचें मन भरून येई.

मुनशीजी त्याला अरेबियन नाइट्समधल्या गोष्टीही सांगत असत. त्या ऐकल्या म्हणजे त्याच्या कल्पनाशक्तीला इतकें भरतें येई कीं, रात्रीं झोंपी गेल्यावर समंध, जादूचा गालिचा, अल्लाउद्दिन व त्याचा दिवा, वाऱ्यालाही मागें टाकणारे असे अरबी घोडे यांचींच त्याला स्वप्नें पडत. याच सुमारास त्याच्या वडिलांनीं त्याला अरब जातीचें एक तट्टू घेऊन दिलें. इतकी ही सुंदर देणगी मिळाल्यावर जवाहरचा आनंद गगनांत मावेना! त्यानें आपल्या या तट्टाचें ‘रक्ष’ असें नांव ठेवलें. त्याच्या पाठीवर वसून तो आतां रोज वाहेर दौड करूं लागला. त्याची या रक्षबरोबर चांगलीच गट्टी जमली. या नव्या संवगड्यामुळें जवाहरचा पूर्वींचा एकटेपणा नाहींसा झाला, इतकेंच नव्हे तर आपल्याला एखादें भावंड नाहीं, ही जी पूर्वीं त्याला उणीव भासत असे, तीहि आतां भासेनाशी झाली. जेव्हां जवाहर व रक्ष एकत्र वाहेर जात तेव्हां जवाहर मुनशीजींकडून ऐकलेल्या गोष्टी रक्षला सांगे व मग त्या गोष्टींतल्या प्रसंगांचे काल्पनिक खेळ ते दोघेही खेळूं लागत. कधीं कधीं ते अशी कल्पना करीत कीं, जादूचा व नवलाईचा जो अरबस्थान देश तेथें ते आहेत व मग तेथें काय काय करावें, हें रक्ष जवाहरला सांगे. कारण अरबस्थानची रक्षला नीटशी आठवण नसली, तरी तो

त्याचा मातृदेश असल्यामुळें त्या देशाविषयीं त्याला फार अभिमान वाटे. एक दिवस जवाहरचें धोरण थोडेंसें चुकलें. पक्ष्याप्रमाणें आकाशांतून उडणाऱ्या व अशाच आणखी अनेक अद्भुत गोष्टी करणाऱ्या जादूच्या



घोड्याची जी गोष्ट त्यानें मुनशीजींकडून ऐकली होती, ती त्यानें त्या दिवशीं रक्षला सांगितली

व मग जरा खिन्नपणें तो त्याला म्हणाला, "त्या जादूच्या घोड्याची करामत तुझ्या अंगीं असती, तर किती बरें झालें असतें!"

अर्थातच जवाहरच्या या शब्दांनीं रक्षचा अभिमान दुखावला गेला. त्या जादूच्या घोड्याप्रमाणेंच आपणही तसले चमत्कार करूं शकतों, असें जवाहरला दाखवून देण्याचें त्यानें ठरवलें व हूं कीं चूं न करतां एकदम पुढें धडक मारून त्यानें वेगानें दौडावयाला सुरवात केली. जसजसा तो दौडूं लागला तसतशी त्याची गति वाढूं लागली; ती इतकी कीं, जणूं काय तो वाऱ्याच्या वेगानेंच दौडत आहे, असें वाटूं लागलें. आपली ही करामत दाखवतांना रक्ष इतका बेहोष होऊन गेला होता कीं, त्याच्या पाठीवरून जवाहरनें खालीं जमिनीवर केव्हां लोळण घेतली, याची त्याला मुळीं शुद्धच नव्हती. त्याची एकसारखी चाललेली ती बेफाम दौड त्यानें घर गांठलें, तेव्हांच थांबली. रक्ष जवाहरवांचून एकटाच घरीं आलेला पाहातांच जवाहरचे वडिल व त्याची आई, हीं काळजींत पडलीं. लगेच त्याचा शोध करण्याकरतां चहुंकडे माणसें रवाना झालीं. घरांतली सर्व मंडळी बाहेर पडून तीहि त्याला शोधूं लागली. रक्ष परत येईल, म्हणून जवाहरनें बराच वेळ वाट पाहिली. शेवटीं रक्षचा थांगपत्ता नाहीं, असें पाहिल्यावर तो पायींच घरीं यावयाला निघाला. वाटेंत त्याचा शोध करण्याकरतां निघालेलीं माणसें त्याला भेटलीं. तो सहीसलामत घरीं परत आलेला पाहून सर्वांची काळजी दूर झाली. घरांतल्या मंडळीचा त्या दिवशींचा आनंद कांहीं विचारूं नका. एक मर्द गडी

म्हणून सर्वांनीं जवाहरची वाहवा केली. तबेल्यांत जखडल्या ठिकाणीं रक्षला मात्र सर्वांकडून होणारी नाचक्की सहन करावी लागली.

त्या दिवशीं घडलेल्या प्रसंगामुळें जवाहर व रक्ष यांच्या मैत्रीमध्यें मात्र



मुळींच विघाड आला नाहीं. रोज घराबाहेर पडून मजेनें एकत्र फेरफटका करण्याचा त्या दोघांचा क्रम यानंतरही बरेच दिवस चालू राहिला.

जवाहरच्या आयुष्यांतली अत्यंत उल्हासाची गोष्ट कुठली असेल तर ती म्हणजे सणाचे दिवस. एकदा सण केव्हां येतो, याची तो उत्कंठेनें वाट पाहात राही. होळीचा सण आला कीं, तो आपली

पिचकारी भडक रंगांनीं भरून घेई व ते रंग मोठ्या माणसांच्या अंगावर उडवी. बागेंत त्यांचा पाठलाग करीत धांवण्यांत व त्यांच्यावर रंग पडत असतांना त्यांच्या तोंडून निघणाऱ्या किंकाळ्या ऐकण्यांत तो किती हर्षभरित होई !

याहूनही त्याला जास्ती प्रिय असा सण म्हणजे दिवाळीचा. कारण त्या दिवशींची चिमुकल्या दिव्यांची रोषनाई पाहून त्याच्या उत्साहाला भरतें येई.

कुटुंबांत एखादें लग्न निघालें, म्हणजे तर जवाहरचा आनंद विचारूच नका ! कारण लग्नसमारंभ म्हटला म्हणजे मेजवान्या, दारूकाम, त्याच्याच वयाच्या इतर लहान मुलांची संगत आणि त्यांत एखादी परगांवची सफर, या मौजेच्या गोष्टी आल्याच.

पण सर्वांत जास्त उत्कंठेनें ज्या दिवसाची तो वाट पाही व त्याच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाचा असा वर्षांतला दिवस म्हणजे त्याचा वाढदिवस. इतर सर्व दिवसांना मागें टाकणारा असा हा दिवस ! या दिवशीं जवाहर म्हणजे एक बडें प्रस्थच !

जवाहर म्हणजे मोतीलालचा पहिला व एकुलता एक मुलगा असल्यामुळें नेहरू-कुटुंबामध्यें हा दिवस म्हणजे जणूं काय एक शुभ दिवसच असें मानलें जाई.

या दिवशीं भल्या पहांटेस जवाहरचा तुळाभार करण्यांत येऊन त्याच्या वजना इतकें जिचें वजन भरेल, अशी गहूं व इतर अन्नसामुग्री गरिबांना दान करण्यांत येई. हा तुळाभार करतांना तराजूच्या एका पारड्यांत बसून दुसऱ्या पारड्यांत जसजसे गहूं ओतले जात, तसतसे त्या पहिल्या पारड्यांतून हळुहळू वर जाण्यांत जवाहरला किती गंमत वाटे !

यानंतर त्याची आई त्याला आंघोळ घाली व त्याच्या अंगावर सुंदर नवे कपडे चढवी. एवढें झाल्यावर वाढदिवसा निमित्त त्याला देणग्या देणें, ही जी जवाहरला अत्यंत उल्हासित करणारी त्या दिवशींची गोष्ट, तिला सुरवात होई ! कागदांत गुंडाळलेल्या देणग्या एकामागोमागं एक त्याच्या हातीं देण्यांत येऊं लागल्या, म्हणजे त्या प्रत्येक कागदाच्या पुडक्यामध्यें अमुक एक वस्तू असेल असें तो तर्कानें ठरवी. पण बहुधा त्याचा हा तर्क खोटा ठरे. कारण त्यांतलें एकेक पुडकें उघडून पाहिल्यावर त्याला वाटलें होतें, त्याहून कितीतरी जास्त नवलाईची वस्तू त्यांत त्याला आढळून येई. त्याला मिळणाऱ्या या देणग्याही कांहीं थोड्याथोडक्या नसत. कारण त्याच्या वाढदिवसाची कोणाला आठवण राहिली नाहीं, असें कधीं होत नसे.

नंतर रात्रीं मेजवानी होई. या मेजवानीला पुष्कळशा पाहुण्यांना बोलावण्यांत येई. खाण्यापिण्याच्या अनेक रुचकर वस्तूंची या मेजवानीमध्यें अगदीं रेलचेल असे. त्यांवर सर्वजण चांगलाच हात मारून घेत व त्या कामीं जवाहर इतर सर्वांना मागें टाकी !

हा सबंध दिवस किती लवकर संपला, असें जवाहरला वाटे आणि त्या रात्रीं बिछान्यावर पडल्यावर वाढदिवस हा वर्षांतून एकदांच कां बरें येतो, अशा विचारानें त्याचें मन खिन्न होई !

जवाहर दहा वर्षांचा झाला, तेव्हां नेहरूकुटुंब एका टोलेजंग नव्या घरामध्यें राहावयाला गेलें. या घराचें नांव ‘आनंद-भवन’ असें ठेवण्यांत आलें. ‘आनंद-भवन’ याचा अर्थ आनंदानें भरलेलें घर असा आहे, हें तुला माहीतच आहे, कुमकुम् या ऐसपैस घराच्या आवारामध्यें एक प्रशस्त बाग व एक पोहोण्याचा तलावही आहे. जवाहरला हें नवें

घर पाहून फारच आनंद वाटला. 'विशेषतः पोहोण्याचा तलाव ही तर त्याच्या फारच आवडीची जागा बनली. आपला बराचसा वेळ तो त्याजागीं घालवूं लागला व लवकरच तो चांगलें पोहावयाला शिकला. संध्याकाळच्यावेळीं त्याच्या वडिलांचे स्नेही येथें पोहावयाला येत. कारण अलाहाबादमध्यें हा पहिलाच पोहोण्याचा तलाव होता. त्यामुळें त्या शहरांतल्या लोकांनाही एक मोठीच नवलाईची व कुतूहलाची गोष्ट वाटूं लागली होती.

रोज संध्याकाळीं मोतिलालची स्नेहीमंडळी पोहोण्यासाठीं या तलावावर जमा झाली म्हणजे जवाहरला भलताच उल्हास येई. कारण स्वतःची पोहोण्यामधली हुषारी या लोकांना दाखवायला व त्यांच्यापैकीं ज्यांना नीटसें पोहावयाला येत नसे, त्यांच्याशीं टिवल्याबावल्या करावयाला, तो अधीर झालेला असे. जे अर्धवट पोहोणारे व पाण्यांत शिरून कसेतरी आडवेतिडवे हात मारणारे होते, त्यांच्यामागें नकळत जाऊन त्यांचीं डोकीं पाण्यांत बुचकळवणें किंवा तलावाच्या कांठावर कोणी उभे असले, तर त्याना अचानक पाण्यांत ढकलून देणें, ही गोष्ट त्याला फार गमतीची वाटे. तो तलावाजवळ असला म्हणजे पोहावयाला आलेल्या या अशा मोठ्या माणसांची अगदीं त्रेधा उडून जाई.

'आनंद–भवन' मधली आणखी एक मौजेची गोष्ट म्हणजे, या घरीं विजेचे दिवे होते, ही अलाहाबादमधल्या दुसऱ्या कुठल्याही घरीं तेव्हां विजेच्या बत्त्या आल्या नव्हत्या. अशी अपूर्व चीज घरीं असल्यामुळें तासचे तास या विजेच्या शास्त्राचें गूढ उकलून पाहाण्यामध्यें जवाहरला फार आनंद वाटे.


'आनंद-भवन' मध्यें नेहमीच पाहुण्यांची गर्दी असे. कारण मोतीलालना आपली स्नेहीमंडळी आपल्या घरीं आली गेलेली आवडे. या स्नेहीमंडळीबरोबर मोतीलाल थट्टाविनोद करतांना व मजेंत गप्पा मारतांना कधीं कधीं दारूही पित. अशाप्रसंगीं जवाहर दिवाणखान्या-बाहेर सोडलेल्या पडद्याआड लपून, हें सर्व पाही. एकदां तो असाच पडद्याआडून आंत चाललेल्या गोष्टी चोरून पाहात आहे ही गोष्ट मोतीलालच्या लक्ष्यांत आल्यावर त्यांनीं त्याला पकडून आंत नेलें. इतकेंच नव्हे, तर त्याची यावेळीं जास्तीच फजिती करणारी गोष्ट म्हणजे त्याला कांहीं वेळ आपल्या मांडीवर त्यांनीं बसवून ठेवलें व नेहमीप्रमाणें आपल्या स्नेह्यांबरोबर ते दारू पिऊं लागले. दारू ही काय चीज आहे, हें जवाहरला माहित नव्हतें. कांहीं वेळानें तो धांवत आंत गेला व आपल्या आईला आश्चर्यानें म्हणाला, "आई, आई! बाबा रक्त पित आहेत!"

लवकरच जवाहरच्या बाबतींत एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. त्याला बहीण झाली. ज्या दिवशीं त्याचें हें भावंड जन्माला आलें, त्या दिवशीं जवाहर आपल्या आईच्या खोलीबाहेर उत्सुकतेनें त्या बातमीची वाट पाहात होता. अखेरीस डॉक्टर खोलीबाहेर आले व त्याला बहिण झाली, हें त्यांनीं त्याला सांगितलें. ही बातमी ऐकून जवाहर हर्षभरित झाला. पण यानंतर डॉक्टर पुढें जें काय बोलले, त्यामुळें त्याच्या या सर्व आनंदावर विरजण पडलें. डॉक्टर त्याला म्हणाले, "तुला बहीण झाली, हें बरें झालें. भाऊ झाला असतां तर तुझ्या वडिलांच्या इस्टेटीमधला अर्धा भाग तुला त्याला द्यावा लागला असता." डॉक्टर हें थट्टेनें

बोलले होते. पण त्यांच्या या शब्दांचा अर्थ जवाहरला कळल्यावांचून राहिला नाहीं व भावाला इस्टेटींतला वांटा गेला, तर त्यावद्दल वाईट वाटून घेण्याइतका आप्पलपोटेपणा आपल्यामध्यें आहे, असें दुसऱ्यांना वाटावें, याबद्दल त्याचें मन फार खिन्न झालें.

यानंतर एक वर्ष गेलें. जवाहरला अकरावें वर्ष लागलें. या वर्षापासून मिस्टर ब्रूक्स नांवाचे एक इंग्रज शिक्षक त्याला शिकवूं लागले. मिस्टर ब्रूक्स हे एक हुषार गृहस्थ होते. त्यांच्या मदतीनें जवाहरनें इंग्लिशमधलीं पुष्कळशीं पुस्तकें वाचून काढलीं. 'जंगल बुक' व 'किम्' त्याचप्रमाणें त्याच्या विशेष आवडीचा ग्रंथकार जो लेव्हिस कॅरोल, त्याचीं सर्व पुस्तकें त्याला फार आवडलीं. डिकन्स, थॅकरे, वेल्स यांच्या व इतर चांगल्या इंग्लिश ग्रंथकारांच्या बऱ्याच कादंबऱ्याही त्यानें वाचल्या. मिस्टर ब्रूक्सच्या तोंडून 'थिऑसफी' संबंधीही बरेचसें त्यानें ऐकलें. थिऑसफी म्हणजे काय, हें माहित आहे का, तुला कुमकुम? मनुष्य व निसर्ग, यांसंबंधींचें सत्य समजावून देणारें तत्त्वज्ञान म्हणजे थिऑसफी, असें या थिऑसफीवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचें म्हणणें आहे. सर्व प्राण्यांच्या बाबतींत बंधुभाव मानावा, असें हें तत्त्वज्ञान शिकवतें. बहुतेक सर्व धर्मांप्रमाणें या थिऑसफीचेंही साध्य म्हणजे मानवी आत्म्याचा पूर्ण विकास, हें आहे. मिस्टर ब्रूक्स थिऑसफी संबंधीं जें कांहीं बोलत, त्यांत जवाहरला समजे, असें जरी फारच थोडें असे, तरी थिऑसफीवर श्रद्धा असणाऱ्या लोकांच्या म्हणजे थिऑसफिस्टांच्या ज्या सभा भरत, त्या सभांना मिस्टर ब्रूक्सबरोबर तो हजर राही, या सभांमध्यें वक्त्यांची जीं भाषणें होत, त्यांतलें कांहींच त्याला समजत नसे, पण त्याच्या कानांला हीं भाषणें

एवढीं गोड लागत कीं, तीं ऐकून त्यानें या थिऑसफिकल सोसायटीचा सभासद होण्याचें ठरवलें. त्या सभासदांमध्यें त्याच्या इतका वयानें लहान असा दुसरा कोणी नव्हता.



जवाहरच्या या वयामध्यें त्याच्याशीं, कुमकुम, जर का तुझी ओळख झाली असती, तर त्याचा त्या वेळचा स्वभाव तुला मुळींच आवडला नसता व अशा या मिजासखोर मुलाच्या गोष्टीमध्यें ऐकण्यासारखें काय असणार, असें तूं म्हणाली

असतीस. पण त्याचा हा स्वभाव पुढें सुधारला. मिस्टर ब्रूक्स अलाहाबादमधून निघून गेल्यावर जवाहरची थिऑसफीबद्दलचा उत्साहही कायमचा मावळला.

या सुमारास जगामध्यें एक युद्ध सुरू झालें. या युद्धामध्यें आशिया खंडातला जपान सारखा एक लहानसा देश रशियासारख्या फार मोठ्या देशाबरोबर निकरानें लढत होता. या युद्धासंबंधीं कोणाबरोबरही बोलणें निघालें कीं, जवाहर जपानची बाजू घेई. कारण जपानच्या प्राचीन कालच्या धीरोदात्त गोष्टी त्यानें वाचल्या होत्या. आणि अशा प्रसंगीं आपल्या हिंदुस्थान देशाविषयींचे विचार मग त्याच्या मनांत घोळूं लागत. आपल्या या देशाला व युरोपियन देशांच्या सत्तेखालीं असलेल्या सबंध आशिया खंडाला, एखाद्या इतिहासकालीन दिग्विजयी वीराप्रमाणें पराक्रम गाजवून, आपण पारतंत्र्यांतून मुक्त केलें आहे, असें कल्पनाचित्र रंगवण्यांत त्याचें मन तन्मय होऊन जाई.


# ३. जवाहरचें जगपर्यटण

अशा रीतीनें वाढतां वाढतां जवाहर आतां पंधरा वर्षांचा एक चलाख मुलगा झाला. या सुमारास आपला हा देश सोडून जगामधल्या दूरदूरच्या इतर देशांत प्रवास करावयाचें त्याच्या वडिलांनीं ठरवलें व एक दिवस मे महिन्यामध्यें आपली पत्नी व दोन मुलें यांना घेऊन इंग्लंडला जाण्याकरतां ते बोटीवर चढले. हल्लीं कितीतरी लोक परदेशीं जातात व परदेशीं जाणें ही आपल्याला आतां विशेष मोठी गोष्ट असें वाटत नाहीं. पण त्या जुन्या काळामध्यें आपले लोक क्वचितच परदेशचा प्रवास करीत व असा परदेशचा प्रवास करावयाला कोणी निघाले, म्हणजे त्यांचे नातेवाईक व इष्टमित्र यांना ती गोष्ट आवडत नसे. असा परदेशचा प्रवास करून आलेल्यांबरोबर हे इतर लोक मग कसलाही संबंध ठेवीत नसत. कारण समुद्रापार प्रवास केल्यानें व परकी देशांत जाऊन राहिल्यानें माणूस बाटतो, अशी त्यांची समजूत असे. पण मोतीलाल हे निश्चयी स्वभावाचे गृहस्थ असल्यामुळें त्यांना या जुन्या भोळसर विचारांची पर्वा वाटत नव्हती. त्यामुळें आपल्या कुटुंबांतल्या माणसांसह इंग्लंडसारख्या दूरच्या देशांत ते जावयाला निघाले. जेथें अत्यंत श्रीमंत अशाच इंग्रज लोकांचीं मुलें शिकावयाला जातात, अशा इंग्लंडमधल्या एका मोठ्या विद्यालयामध्यें त्यांनीं जवाहरला शिकावयाला ठेवलें. नंतर ते स्वतः, त्यांची पत्नी व लहान मुलगी इतकी मंडळी युरोपांतील इतर देश पाहात पाहात हिंदुस्थानांत परत आली.

घर सोडून दूर अनोळखी लोकांमध्यें राहाण्याची जवाहरची ही पहिलीच खेप. त्यामुळें त्याला सुरवातीला त्याचें हें नवीन विद्यालय मुळींच आवडेनासें होऊन तेथें त्याला ओकें ओकें वाटूं लागे व पुनः पुनः आपल्या घरची त्याला आठवण होई. त्याच्या वर्गांतल्या इंग्रज मुलांच्या संगतीचाही त्याला कंटाळा येई, कारण ते मुलगे बुद्धीनें जेमतेम असून त्यांना आपले धडे व खेळ यांवांचून इतर कुठल्याही गोष्टींमध्यें गोडी वाटत नसे. पण जवाहरला जगांत घडणाऱ्या गोष्टींचें बरेंच ज्ञान होतें. कारण तो नेहमी वर्तमानपत्रें वाचीत असे. एक दिवस असें झालें कीं, त्या दिवसांत नुकत्याच होऊन गेलेल्या इंग्लंडमधल्या निवडणुकांसंबंधीं त्याच्या एका शिक्षकानें जेव्हां प्रश्न विचारले, तेव्हां जवाहरशिवाय वर्गांतल्या इतर कुठल्याही मुलाला त्याचीं उत्तरें देतां आलीं नाहींत. जवाहरनें मात्र या प्रश्नांचीं उत्तर देतांना निवडणुकीनंतर इंग्लंडमध्यें अधिकारावर आलेल्या नव्या पक्षासंबंधींची सर्व माहिती नीट सांगितली.

इंग्लंडमधल्या या विद्यालयांत शिकत असतांना जवाहरचा स्वतःच्या देशाशीं मुळींच संबंध राहिला नव्हता. पण तेथें घडणाऱ्या मोठमोठ्या घडामोडींसंबंधींची माहिती त्याला वर्तमानपत्रांमध्यें वाचावयाला मिळे. पंजाब, बंगाल व महाराष्ट्र या प्रांतांतील लोक स्वराज्याकरतां झगडत आहेत व त्यांनीं स्वदेशीची व परदेशी कापडांवर बहिष्कार घालण्याची चळवळ सुरू केली आहे, हें कळतांच त्याला यावेळीं स्फुरण चढलें. पण आपल्या देशासंबंधींच्या अशा गोष्टी मन मोकळेपणानें त्याला ज्यांच्याशीं बोलतां येईल असें कोणींच तेथें नव्हते. त्यामुळें, स्वातंत्र्यसंपादनाकरतां इतर देशांतील लोक कसे लढले, या संबंधींचीं स्फुर्तिदायक पुस्तकें

वाचण्यांत तो आपला सारा वेळ घालवी. या सर्व पुस्तकांमध्यें त्याला सर्वांत जास्त आवडलेलीं पुस्तकें म्हणजे ग्यारिबॉल्डींसंबंधींचीं होत.



हा ग्यारिबॉल्डी कोण, हें कुमकुम तुला माहित आहे का? ग्यारिबॉल्डी हा शंभर वर्षांमागें होऊन गेलेला इटली देशामधला एक फार मोठा देशभक्त होता. त्या काळीं इटली देश लहान लहान अशा अनेक संस्थानांमध्यें विभागला गेला होता व या संस्थानांवर ज्या निरनिराळ्या संस्थानिकांची सत्ता होती, त्यांच्या आपसांत नेहमी लढाया चाललेल्या असत. या लढायांमध्यें हे संस्थानिक ऑस्ट्रिया व फ्रान्स या देशांची मदत घेत त्यामुळें या परक्या देशांचें इटलीवर नेहमी वर्चस्व चाले. आपल्या देशाची ही वाईट स्थिति घालवण्याकरतां ग्यारिबॉल्डीनें तरुण इटालियन देश-भक्तांचें एक सैन्य तयार केलें. या सैन्याचा उपयोग करून त्यानें व त्याच्या अनुयायांनीं फ्रान्स व

ऑस्ट्रिया, या परक्या देशांची सत्ता झुगारून दिली व आपल्या देशाला एक स्वतंत्र, सामर्थ्यवान् व एकवटलेलें असें राष्ट्र बनवलें.

महिन्यांमागून महिने जाऊं लागले, तसतसा जवाहर या विद्यालयांत अधिकाधिक बेचैन होऊं लागला. अखेरीस या विद्यालयामधला त्याचा अभ्यासक्रम पुरा झाला व पुढील शिक्षणाकरतां तो कॅंब्रिजला गेला. कॅंब्रिज हें एक प्रख्यात विद्यापीठाचें ठिकाण आहे. या ठिकाणीं पदवी मिळवण्याकरतां तीन वर्षं अभ्यास करून हें कॉलेजचें शिक्षण त्यानें पुरें केलें. कॅंब्रिजला असतांना तो कित्येकदां अविचारानें वागे व तेथील आपल्या श्रीमंत इंग्रज मित्रांचे अनुकरण करण्यांत पुष्कळसे पैसे अनाठायीं खर्च करी. त्याचें हें वागणें पाहून त्याचे वडील तेव्हां फार काळजींत पडले. पण सुदैवानें जवाहरला आपली ही चूक लवकरच कळून आली व ही खर्चिकपणाची संवय त्यानें लवकरच सोडून दिली. याच सुमारास आपल्याला आणखी एक बहीण होऊन आपल्या कुटुंबामध्यें भर पडली आहे, ही बातमी त्याला कळली.

सर्व तरुण मुलांना आपण पुढें जगांत काय करणार, हें आधीं ठरवावें लागतें. पण आपण पुढें कोण होणार, यासंबंधींचा जवाहरचा कांहींच ठाम विचार अजून ठरला नव्हता. जवाहरला यावेळीं असें एक वाटत असे कीं, आपण इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें शिरून हिंदुस्थानमध्यें एक बडा सरकारी अधिकारी व्हावें. पण त्याचें वय कमी पडल्यानें त्याला या इंडियन सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेला बसतां आलें नाहीं. ब्रिटिश सत्तेविरुद्ध झगडून हिंदुस्थानला स्वतंत्र करावें, असे ज्या जवाहरचे विचार, त्यानें त्याच ब्रिटिश सरकारचा अशा



रीतीनें एक हस्तक होण्याचें मनांत आणावें, या गोष्टीचें, कुमकुम तुला नवल वाटेल. पण जवाहर अद्याप वयानें लहान होता व या अशा प्रश्नांसंबंधीं त्यानें काळजीपूर्वक विचार केला नव्हता. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेला बसतां येत नाहीं असें पाहिल्यावर आपल्या वडिलांप्रमाणें आपणही वकील व्हावें असें त्यानें ठरवलें व केंब्रिजचा अभ्यासक्रम संपतांच कायद्याचा अभ्यास करण्याकरतां इंग्लंडची राजधानी जी लंडन तेथें तो गेला.

कुमकुम, तुला जर असें वाटलें असेल कीं, जवाहर आपला सर्व वेळ अभ्यास करण्यांतच घालवीत होता, तर तें खरें नाहीं. सुटीचे दिवस आले कीं तो आपला वेळ बऱ्याच मजेंत घालवी. एकदां अशा सुटीमध्यें तो आपल्या वडिलांबरोबर जर्मनीची राजधानी जी बर्लिन तेथें गेला होता. ते दोघेही या शहरामध्यें पोंहोंचले, त्याचवेळीं तेथें काउंट झेपेलिननें आपलें विमान उडवण्याचा प्रयोग करून दाखवला, तो त्यांना पाहावयाला मिळाला. काउंट झेपेलिननें विमानाचा शोध लावून जगभर कीर्ति मिळवली होती. त्याच्या या विमानाला त्याचेंच 'झेपेलिन' हें नांव देण्यांत आलें होतें. आपलें हें विमान तो बर्लिनला यावेळीं पहिल्यांदाच उडवून दाखवीत असल्यामुळें जवाहरला त्यावेळीं बर्लिनला पाहावयाला मिळवलेला हा प्रसंग फारच महत्त्वाचा होता. बर्लिनमधल्या सर्व लोकांचीं मनें यावेळीं उत्साहानें भरून गेलीं होतीं. ज्यावेळीं झेपेलिननें आपलें विमान हवेंत उडवून दाखवून नंतर तें खालीं जमिनीवर आणलें, त्यावेळीं जर्मनीचा बादशाहा कैसर यानें स्वत: तेथें हजर राहून झेपेलिनचें स्वागत केलें. मेजवान्या, नाचरंग, मेळे अशा प्रकारच्या आनंदोत्सवामध्यें बर्लिनच्या नागरिकांनीं तो

सबंध दिवस साजरा केला. बर्लिन शहरामध्यें त्या दिवशीं सर्वांना झेपेलिनचें चित्र वांटण्यांत आलें. जवाहरलाही त्या दिवशीं हें चित्र मिळालें व तें अजून त्याच्याजवळ आहे.

दुसऱ्या एका प्रसंगीं जवाहर आपल्या एका इंग्रज मित्राबरोबर नॉर्वेच्या सुंदर, डोंगराळ प्रदेशांत प्रवास करीत असतांना त्याच्याकडून एक साहसाची गोष्ट घडली. एक दिवस जवाहर व त्याचा हा मित्र दूरची मजल मारून थकलेले असे एका हॉटेलमध्यें येऊन पोंहोंचले. तेथें पहिल्यांदा लगेच त्यांना जरूर होती, ती गोष्ट म्हणजे आंघोळ. पण हॉटेलचा मालक त्यांना म्हणाला, "येथें आंघोळीची सोय नाहीं. पण तुम्हांला आंघोळ हवीच असली, तर ती त्या जवळच्या ओढ्यावर जाऊन तुम्हांला करतां येईल." यावर ते दोघेही त्या ओढ्यावर गेले. एका बर्फखंडांतून निघून खालीं धांव घेणाऱ्या या ओढ्याचा प्रवाह फारच मोठ्या वेगानें वाहात होता. पहिल्यांदा जवाहर या ओढ्यामध्यें उतरला. उतरतांना त्याचा पाय घसरून तो पाण्यांत उताणा पडला व लगेच त्या बर्फाइतक्या गार पाण्यानें त्याचें अंग भेरलें. हालचाल करतां येत नाहीं, अशा स्थितींत धो धो वाहाणाऱ्या त्या प्रचंड झोतामध्यें तो वाहून जाऊं लागला. पण त्याच्या मित्रानें यावेळीं ओढ्याच्या कांठानें धांवत जाऊन त्याचा पाय पकडून त्याला पाण्यांतून कांठावर ओढून घेतलें. तेथून थोड्याच पावलांच्या अंतरावर एका मोठ्या खडकावरून हा ओढा धबधब्याप्रमाणें खालीं पडत होता. जर जवाहरच्या मित्रानें त्याला पाण्यांतून बाहेर ओढलें नसतें, तर या धबधब्यावरून खालीं पडून तो प्राणाला मुकला असता. जवाहर व त्याचा मित्र यांना त्या धबधब्याची पहिल्यांदा कल्पना नव्हती. पण नंतर जेव्हां त्यांनीं तो पाहिला, तेव्हां त्यांच्या छातींत धस्स झालें!

# ४. परत घरीं

१९१२ सालच्या शरदृऋतूमध्यें जवाहर आपल्या मातृभूमीला परत आला. त्याला तेविसावें वर्ष लागलें होतें व तो आतां तरुण वयांत आला होता. तो येणार हें कळतांच त्याची आई कितीतरी दिवस आधींपासून त्याच्या स्वागताची तयारी करण्यांत गुंतली होती. आणि तो प्रत्यक्ष घरीं येऊन पोंहोचल्यावर तर सर्वांचा उल्हास कांहीं विचारूं नका! त्या वेळीं नेहरू कुटुंब मसुरीला राहावयाला गेलें होतें. जवाहर तेथें जाऊन या आपल्या घरच्या मंडळींबरोबर राहूं लागला. त्याची सर्वांत धाकटी बहीण जी कृष्णा तिला आतां त्यानें पहिल्यांदाच पाहिलें. कृष्णाचें वय त्यावेळीं पांच वर्षांचें होतें. या आपल्या देखण्या पण अनोळखी भावाची घरांतलीं सर्व माणसें इतकी बडदास्त ठेवतात, हें पाहिल्यावर तिला जवाहरचा बराच हेवा वाटूं लागला.

हा कांहीं काळ असा होता कीं, तेव्हां या आपल्या देशामध्यें सगळीकडे सामसूम होतें. बंगालच्या फाळणीविरुद्ध लोकांनीं केलेला उठाव संपला होता. इंडियन् नॅशनल कॉंग्रेसनें आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्याच्या बाबतींत अजून आशादायक स्वरूप धारण केलें नव्हतें.

बरं का, कुमकुम, ही कॉंग्रेस जवाहरचा जन्म होण्याच्या चार वर्षें आधीं दोघां इंग्रज गृहस्थानीं स्थापन केली होती. ज्या ठिकाणीं इंग्रज ऑफिसर व पाश्चात्य राहणी पत्करलेलीं हिंदी माणसें, यांच्या गांठीभेटी होत, असा एक क्लब, असें या कॉंग्रेसचें स्वरूप होतें

हा असा क्लब, पुढें एक मोठी सामर्थ्यवान् राष्ट्रीयसंस्था बनावी व तिनें स्वतःकडे देशांतील सर्व भागांतून लाखों माणसें आकर्षित करावीं हें केवढें आश्चर्य !

याचें कारण हें कीं, हळूहळू या कॉंग्रेसला देशाच्या दुःस्थितीची जाणीव होऊं लागली.

त्यामुळें, १९०७ सालीं जेव्हां बंगालची फाळणी झाली, तेव्हां या कॉंग्रेसमधल्या लोकांनीं या फाळणीला विरोध केला व सरकारला ती रद्द करावयाला भाग पाडलें.

पण १९०७ सालच्या या आठवणी लवकरच नाहींशा झाल्या. जुन्या पिढींतल्या लोकांचें कॉंग्रेसमध्यें वर्चस्व झालें होतें व हे लोक सावकाश होणाऱ्या राजकीय सुधारणांवर समाधान मानावें, अशा मताचे असल्यामुळें अशा सुधारणांबाबत सरकारनें दिलेल्या आश्वासनांवर आशा ठेवून ते स्वस्थ बसले होते.

देशाच्या स्थितींत लगेच पालट घडवून आणला पाहिजे, अशी ईर्षा मनांत बाळगून जवाहर हिंदुस्थानांत परत आला होता. त्याच्या जहाल देशभक्तीला कॉंग्रेसची ही समाधानी वृत्ति आवडणें शक्य नव्हतें. जरी त्याच्या वडिलांप्रमाणें तोही या कॉंग्रेसचा सभासद बनला; तरी त्याला आपल्या वडिलांचीं नेमस्त मतें पसंत नव्हतीं. एकदां इंग्लंडमध्यें असतांना त्यानें वर्तमानपत्रामध्यें प्रसिद्ध झालेला त्याच्या वडिलांचा एक लेख वाचला. या लेखामध्यें मोतीलालनीं, बंगालमधल्या तरुणांना त्यांच्या राजकीय अत्याचारांबद्दल दोष दिला होता. या लेखाच्या बाबतींतील आपली नापसंती व्यक्त करून जवाहरनें लगेच आपल्या वडिलांना एक पत्र लिहिलें. " पिताजी, या लेखांतील आपले विचार सरकारच्या चांगल्याच पथ्यावर

पडल्यावांचून राहाणार नाहींत!" असे शब्द त्याच्या या पत्रामध्यें होते. आपल्या मुलाच्या या बेमुर्वतखोरपणाचा मोतीलालना इतका राग आला कीं, त्याला इंग्लंडमधून तत्काळ घरीं बोलवावें, असेंसुद्धां त्यांना त्यावेळीं वाटलें.

काँग्रेसच्या बाबतींत जवाहरची ही अशी निराशा झाली. अखेरीस आपल्या वडिलांच्या देखरेखीखालीं त्यानें अलाहाबादमध्यें वकीलीचें काम सुरू केलें.

तुला माहित आहे का, कुमकुम, मोतीलाल हे एक फार हुषार असे वकील तर होतेच, पण शिवाय ते एक असामान्य योग्यतेचे असे गृहस्थ होते. जवाहर जरी त्यांना भिऊन वागे, तरी त्याला त्यांच्याविषयीं फार प्रेम व आदरही वाटे. आणि तसें म्हटल्यास, या आपल्या सबंध देशामध्यें मोतीलालसंबंधीं ज्याला आदर नव्हता, असा कोणी मनुष्य असेल, असें वाटत नाहीं. ते एक निष्णात कायदेपंडित होते, एवढेंच नव्हे, तर उच्च संस्कृति व गाढ विद्वत्ता या गुणांबद्दलही त्यांची ख्याति होती. अरेबिक व पर्शियन भाषांचे ते एक पंडित असून शिवाय पाश्चात्य परंपरा व संस्कृति यांचेंही त्यांना खोल ज्ञान होतें. आपल्या देशाचे कठिण प्रश्न सोडवण्याच्या बाबतींत पाश्चात्य देशांकडून आपल्याला मार्गदर्शन होईल व त्या देशांकडून आपल्याला पुष्कळशा चांगल्या गोष्टी शिकतां येतील, असा त्यांना विश्वास वाटे. जरी हिंदुस्थानवर सत्ता चालवणाऱ्या ब्रिटिश सरकारविरुद्ध दीर्घकाळपर्यंत ते झगडत राहिले, तरी ब्रिटिश लोकांसंबंधी त्यांना नेहमीच आदराची भावना असे.

त्यांना हिंदुस्थाननें युरोपांतील देशांसारखें व्हावें, असें वाटे. जोपर्यंत आपल्यांतील अडाणी




२०९

चालीरीतीना व भोळसर धार्मिक विधीना आपण चिकटून आहोंत, तोपर्यंत आपण स्वातंत्र्याला पात्र ठरणार नाहीं, अशी त्यांची समजूत होती. त्यामुळें मोतीलालनीं स्वतः या जुनाट कल्पना व चालीरीती झुगारून दिल्या होत्या. ते पाश्चात्य पद्धतीनें राहात. परदेशगमन ज्याकाळीं निषिद्ध मानलें जाई, अशा जुन्याकाळीं ते परदेशचा प्रवास करून आले, इतकेंच नव्हे, तर या परदेशगमनाबद्दल प्रायश्चित्त घेण्याचेंही त्यानीं नाकारलें. या गोष्टीमुळें ते पंडितवर्गामध्यें व समाजांतील मागासलेल्या लोकांमध्यें अप्रिय बनले, पण त्याची फिकीर त्यांनीं बाळगली नाहीं.

जवाहरला सुद्धां त्याच्या वडिलांप्रमाणेंच इंग्रज लोकांबद्दल आदर वाटे व पुष्कळशा बाबतींत स्वतःची मनोवृत्ति त्या लोकांसारखीच आहे, याची त्याला जाणीव होती. त्याच्या मनाची ही अशी घडण होण्याचें कारण म्हणजे या नेहरू कुटुंबांतील मुलांना युरोपियन वळणामध्यें वाढवण्यांत आलें होतें व जवाहरच्या लहानपणीं त्याच्या संगोपिका व शिक्षक, ही युरोपियन होती, हें होय.

महिन्यांमागून महिने जाऊं लागले, तसतसा आपल्या आयुष्क्रमाचा जवाहरला कंटाळा येऊं लागला. स्वातंत्र्याच्या लढ्यामध्यें त्यानें भाग घेण्याची वेळ तर अजून आली नव्हती. म्हणून कोर्टांतल्या कामांत स्वतःचें मन गुंतवून ठेवून देशकार्याच्या संधीची तो वाट पाहात राहिला होता. जेव्हां त्याला काम नसे, तेव्हां तो मधून मधून शिकारीलाही जात असे. तो शिकारीला जाई, तो त्याला श्वापदांना ठार करणें, आवडे म्हणून नव्हे, तर रानावनांतून हिंडण्याची त्याला हौस वाटे म्हणून. बंदूक उडवण्याची त्याला मौज वाटे, म्हणून अधून

मधून तो एखाद्या सावजावर गोळी सोडी, एवढेंच. पण एक दिवस त्याच्या गोळीनें एक हरणाचें पाडस ठार झालें. घायाळ झालेल्या त्या बिचाऱ्या पाडसानें घडपडत त्याच्या पायाशीं लोळण घेतली व पाण्यानें भरलेल्या आपल्या काळ्याभोर, मोठाल्या डोळ्यांनीं वर त्याच्याकडे पाहात त्यानें प्राण सोडला.



आपला हा एवढा मोठा पुढारी, एका कोंवळ्या, निरुपद्रवी प्राण्याचा जीव घेऊं शकतो, हें पाहून कुमकुम, तुझें मन खिन्न झालें असेल. कारण तुला सर्व जनावरांविषयीं प्रेम वाटतें व लहानगीं हरणें तर तुला विशेष प्यार ! आणि अशीं हीं हरणें जवळपासच्या एखाद्या कुरणांत चरावयाला आलेलीं दिसलीं कीं, तूं जाऊन त्यांच्याशीं गट्टी करण्याचा प्रयत्न करतेस. पण तीं एवढीं भित्रीं कीं, तुला पाहातांच तीं दूर पळून जातात.

जवाहरचें मन, कुमकुम, तुझ्यासारखेंच मृदू व प्रेमळ आहे. जेव्हां त्यानें तें हरणाचें पाडस दु:खानें विव्हळत आपल्याकडे बघत आहे,

असें पाहिलें, तेव्हां त्याच्या डोळ्यांतून आंसवें वाहूं लागलीं व यापुढें पुन: कधींही बंदूक उडवायाची नाहीं, असें त्यानें यावेळीं ठरवलें.

याच सुमारास अशी एक बातमी आली कीं, युरोपमध्यें युद्ध सुरू झालें आहे. या युद्धाला लोक जागतिक युद्ध असें म्हणू लागले. पण हें युद्ध चाललें होतें, तो जगाचा भाग आपल्या देशापासून इतका दूर होता कीं, सुरवातीला या युद्धाची झळ आपल्याला लागली नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपल्या देशांत तेव्हां एवढी शांतता होती कीं, ती पाहिल्यावर जगांत कुठें तरी युद्ध चाललें असेल व माणसें एकमेकांना ठार मारीत असतील, ही गोष्टच मुळीं खरी वाटेना! पण हळूहळू या युद्धाचा संबंध आपल्या देशाकडे येऊन पोहोंचूं लागला. कारण या युद्धांत आपल्या मदतीकरतां सरकारला या देशांतील तरुणांना बोलावणें भाग पडलें. या तरुणांपैकीं बरेचजण त्यावेळीं सैन्यांत दाखल झाले व फ्रान्स व मेसापोटेमिया (ज्याला आज इराक असें म्हणतात, तो अरेबियन नाइट्समधला देश) येथील रणभूमीवर त्यांनीं मर्दुमकी गाजवली. जेव्हां हें युद्ध संपलें, तेव्हां हिंदी लोकांना असें वाटूं लागलें कीं, या युद्धामध्यें ब्रिटिश सरकारला मदत करण्यांत आपल्या देशानें जी झीज सोसली आहे, त्याबद्दल मोबदला म्हणून आपल्याला होमरूल–स्वराज्य मिळालें पाहिजे. या होमरूलकरतां लोकांनीं आतां चळवळ सुरू केली.

हे दिवस फारच खळबळीचे होते. आपण सरकारकडून कांहीं तरी मोठा लाभ पदरांत पाडून घेणार, असा यावेळीं लोकांचा समज झाला. जवाहर तर या चळवळींत सामिल झालाच,

पण मोतिलाल नेहरूही या चळवळींत भाग घेऊं लागले. कॉंग्रेसमधल्या जुन्या पिढीतल्या लोकांचीं नेमस्त मतें मोतीलालना पसंत होतीं, हें कुमकुम, तुला मी यापूर्वीं सांगितलेंच आहे. जवाहरनें कॉंग्रेसमधल्या दुसऱ्या जहाल पक्षाला जाऊन मिळावें, हें त्यांना आवडत नसे. त्यामुळें त्या दोघांचे घरीं नेहमी मतभेद होत व खटके उडत. पण आपल्या देशानें जास्ती कणखरपणा दाखवला पाहिजे, असें आतां मोतीलालनासुद्धां वाटूं लागलें.

त्या दिवसांत सबंध देशभर कितीतरी जाहीरसभा भरवल्या जात. अलाहाबादच्या अशा एका सभेमध्यें जवाहरनें यावेळीं आपलें पहिलें जाहीर भाषण केलें.

कुमकुम, तुला माहित आहे का, जवाहर स्वभावानें जरा बुजरा आहे. त्यामुळें एवढ्या मोठ्या समुदायापुढें हें आपलें पहिलेंच भाषण करतांना त्याचें अवसान गळालें. त्याचें हें भाषण म्हणजे त्यावेळीं एक मामुली गोष्ट होती. पण खरोखरीच आपणां सर्वांच्या दृष्टीनें हा दिवस फार महत्त्वाचा म्हटला पाहिजे. कारण येथून पुढें जवाहरनें आपली ऐषआरामाची सुखासीन राहणी सोडून दिली व स्वातंत्र्याच्या चळवळीला स्वतःला वाहून घेतलें.

असें करणें ही सोपी गोष्ट नव्हती, कुमकुम. कारण यामुळें जवाहरला वारंवार बाहेरून तुरुंगामध्यें व तुरुंगांतून बाहेर, अशा तऱ्हेनें आपलें आयुष्य घालवावें लागलें व ज्यांचा त्याला पूर्वीं यत्किंचितही अनुभव नव्हता, असे कष्टसायास त्याला एकसारखे भोगावे लागले !


# ५. कमला आणि काश्मिर

तो वसंतपंचमीचा दिवस होता, कुमकुम. सगळीकडे झाडें पिवळ्या फुलांनीं बहरलीं होतीं. आणि जिकडेतिकडे उल्हास दिसून येत होता. कारण वसंतपंचमी म्हणजे वसंत ऋतूंतला उत्सवाचा दिवस.

अशा या शुभदिवशीं, बरं का कुमकुम, जवाहरचें त्या साध्या, गोड स्वभावाच्या कमलेशीं लग्न झालें. अवघी सतरा वर्षें वयाची व फारच लाजरी व निष्कपट अशी होती ही कमला.

या लग्न समारंभाचा थाट कांहीं विचारूं नका. जवाहर व त्याच्या कुटुंबांतील मंडळी खास गाडीनें दिल्लीला गेली. ही खास गाडीसुद्धां फुलांनीं व निशाणांनीं शृंगारलेली होती. या लग्नसमारंभाला कितीतरी निमंत्रित पाहुणे आले होते. मेजवान्या, गाणें बजावणें हे प्रकारही एकसारखें चालले होते. लग्न उरकल्यावर सर्व नेहरूमंडळी मग उन्हाळ्यांतले दिवस घालवण्याकरतां त्यांच्या पूर्वजांची भूमि जी काश्मिर, तेथें गेली.

काश्मिरमधला हा हवाफेर जवाहरला फार आवडला. कारण डोंगर, पर्वत या गोष्टींची त्याला फार हौस. त्यानें व त्याच्या चुलतभावानें एकदां या पर्वतप्रदेशांत दूरची मजल मारून यावें, असें ठरवलें. ते घरून निघाले, व उंच उंच कडे चढत, पाणी थिजून बर्फमय बनलेल्या धोक्याच्या नद्या ओलांडीत, पुढें पुढें जाऊं लागले. अधिकाधिक उंच जात जात, ते थेट सिंधदरीपर्यंत गेले. तेथें निमुळत्या वांकड्यातिकड्या खडकांमध्यें जोजिल्ला नांवांची



एक खिंड आहे. तीही त्यांनीं मागें टाकली. हिंदु लोकांच्या यात्रेचें जें पवित्र स्थान अमरनाथची गुहा, तें येथून सातच मैलांच्या अंतरावर आहे, असें कळल्यावर तेथपर्यंत मजल मारावी,

असें त्यांनीं आतां ठरवलें. कारण हें स्थळ पाहाण्याची उत्सुकता जवाहरला फार दिवसांपासून लागली होती. पण हें स्थळ गांठणें ही सोपी गोष्ट नव्हती. कारण हें अंतर फारसें मोठें नसलें, तरी तेथपर्यंतच्या मार्गावर एकसारखा धोक्याचा असा चढ होता. हा चढ चढतांना निमुळते खडक, निसरड्या बर्फमय जागा व बर्फाचे माळ हीं त्यांना ओलांडावीं लागलीं. एकजण घसरून खालीं गेला, तर दुसऱ्यानें त्याला वर ओढून घ्यावें, म्हणून त्यांनीं एका बळकट दोरखंडाच्या एका एका टोंकाला स्वत:ला बांधून घेतलें होतें. अशा स्थितींत लांबची बारा तासांची मजल मारल्यावर अखेरीस ते विस्तीर्ण बर्फमय माळावर येऊन पोंहोंचले. या माळाच्या पलीकडच्या बाजूला अमरनाथची गुहा होती. येथें आल्यावर त्यांच्या अंगीं पुन: उत्साह आला. कारण हा बर्फाचा माळ ओलांडणें म्हणजे फारशी कठिण गोष्ट नाहीं, असें त्यांना वाटलें. पण त्यांचा हा समज चुकीचा होता. या बर्फाच्या माळावर ठिकठिकाणीं खांचखळगे व खंदक होते आणि प्रत्येक पावलाला पायांखालचें बर्फ बाजूला सरके व ते घसरून खालीं जात. पण जवाहर माघार घ्यावयाला तयार नव्हता. अशारीतीनें धडपडत पुढें पुढें जातां जातां एका ठिकाणी जवाहरच्या पायांखालचें बर्फ अचानक बाजूला सरकलें व तो धाडदिशीं बाजूच्या एका अंधाऱ्या, भकास खंदकामध्यें आदळला गेला. पण ज्या दोरखंडानें त्यानें आपल्याला बांधून घेतलें होतें, त्याचा यावेळीं उपयोग झाला. कारण त्या दोरखंडामुळें तो त्या खंदकामध्यें लोंबकळत राहिला व त्याच्या भावाला त्याला वर ओढून घेतां आलें. अखेरीस अमरनाथची ती गुहा गांठणें अशक्य, असें ठरवून ते घरीं जाण्याकरतां परत फिरले.


जरी जागतिक युद्ध संपलें होतें, तरी आपल्या देशाच्या स्थितींत अजून बदल घडून आला नव्हता व देशामध्यें शांतताही नांदत नव्हती. कुठलेंही युद्ध म्हटलें कीं, त्याचें नेहमीं हें असेंच असतें. युद्ध संपल्यावर लोकांमध्यें, विशेषतः युद्धांत लढलेल्या व पुनः नेहमीचा रोजगार करावा लागलेल्या शिपायांमध्यें असंतोष व खळबळ माजल्याशिवाय राहत नाहीं. कारण आपल्या सभोंवतालच्या परिस्थितिमध्यें युद्धानंतर चांगला बदल घडून यावा, अशी त्यांची अपेक्षा असते. पंजाबमध्यें यावेळीं लोकांकडून बरींच अत्याचारांचीं कृत्यें घडूं लागलीं. तीं थांबवण्याकरतां सरकारनें जालीम उपाय योजले व गुन्हेगारांबरोबर कितीतरी निरपराधी माणसांना पकडून तुरुंगाची सजा दिली. या अन्यायाचा प्रतिकार करण्याकरतां महात्मा गांधींना आतां पुढें यावें लागलें. आफ्रिकेंतील आपल्या देशबांधवांच्या हक्काकरतां गांधीजी तेथें निकरानें लढले होतेच. तेथून हिंदुस्थानांत परत आल्यावर दाट अंधारांतील प्रकाशाप्रमाणें ते येथील जनतेपुढें आतां तळपूं लागले व सबंध देशाची आशा व सामर्थ्य यांचें ते उगमस्थान बनले.

या संसारांत क्लेश भोगणें, हें मनुष्यमात्राचें संचितच आहे; उच्च ध्येयाकरतां क्लेश सहन केल्यानें आपल्या जीवनाला उजळा येईल; ज्यांच्याशीं आपलें पटत नाहीं, त्यांना वठणीवर आणण्यासाठीं हिंसक साधनांचा अवलंब केल्यानें आपण स्वतःचाच नाश करून घेऊं, कारण हिंसा ही अमंगळ गोष्ट आहे व कुठलीही अमंगळ गोष्ट स्वतःचाच नाश घडवून आणणारी असते; पण आपण जर आपलें विशुद्ध, आत्मिक बल पणाला लावून निकरानें

शत्रूला प्रतिकार केला, तर त्या शत्रूवर परिणामीं आपण खचित विजय मिळवूं; असें एक नवीन उदात्त तत्त्व गांधीजी आतां आपल्या देशबांधवांना समजावून सांगूं लागले.

लवकरच त्यांनी देशभर चळवळ सुरू केली. या चळवळींत भाग घेणाऱ्यांना शांततेनें सरकारचे कायदे मोडून तुरुंगवास पतकरावा लागे. सरकारबरोबर लढण्याचा गांधीजींनीं दाखवलेला हा नवीन मार्ग पाहिल्यावर जवाहरला स्फुरण चढलें व त्यांच्या चळवळींत भाग घेण्याचें त्यानें ठरवलें. मोतीलालना ही गोष्ट पसंत नव्हती. कारण त्यांचें आपल्या मुलावर पराकाष्ठेचें प्रेम होतें. त्यानें तुरुंगांतल्या हालअपेष्टा भोगाव्या, ही कल्पनाच मुळीं त्यांना सहन करवेना !





पण जवाहर या चळवळींत पडणार, तोंच आपल्या देशांत भीषण परिस्थिति निर्माण झाली. सबंध देशांत हरताळ पाडण्याकरतां गांधींजीनीं जो एक दिवस ठरवला होता त्या दिवशीं अमृतसरमध्यें एक शोचनीय घटना घडून आली. सरकारनें तेथें जाहिरसभा भरवायला मनाई हुकूम काढला होता. तो हुकूम मोडून लोकांच्या झुंडीच्या झुंडी तेथल्या जालियनवाला बागेमध्यें जेव्हां जमा झाल्या, तेव्हां पोलिसांनीं व गोऱ्या सोजिरांनीं तेथें गोळीबार केला. त्यांत कितीतरी लोक मेले व जखमी झाले. या प्रकारामुळें जिकडे तिकडे मोठी खळबळ उडाली.

पंजाबमध्यें घडलेल्या या प्रसंगामुळें लोकांच्या मनावर असा कांहीं परिणाम झाला कीं, सबंध देशभर हिंदु व मुसलमान आतां एकजुटीनें महात्माजींच्या पुढारीपणाखालीं स्वातंत्र्याकरतां लढूं लागले.

# ६. वाईटांतून बरें निघालें

जवाहर या अशा देशकार्यांमध्यें गुंतला असतांना कमलेला एक मुलगी झाली. ही तान्ही मुलगी दिसावयाला इतकी गोड व सुंदर होती कीं, तिला जवाहरनें इंदिरा प्रियदर्शिनी असें नांव ठेवलें.

ते मे महिन्यांतले कडक उन्हाळ्याचे दिवस होते, कुमकुम. जवाहरची पत्नी कमला आणि त्याची आई, यांची प्रकृति ठीक नव्हती, म्हणून श्रीमंत लोकांचें हवाफेर करण्याचें हिमालयांतील मसुरी हें जें डोंगरी ठिकाण तेथें जवाहर त्यांना घेऊन गेला. मसुरीला ज्या सेव्हाय हॉटेलमध्यें ही नेहरूमंडळी राहिली, त्याच हॉटेलमध्यें त्यावेळीं अफगाणिस्थानांतलीं कांहीं वडीं माणसें येऊन उतरलीं होतीं. तुला माहित आहे का, कुमकुम, हिमालयाच्या पश्चिमेस हा अफगाणिस्थान देश आहे. ब्रिटिशांची त्यावेळीं अफगाणीस्थानबरोबर लढाई चालली होती व त्या देशांतील या बड्या माणसांना तहाच्या अटी ठरवण्याकरतां हिंदुस्थानांत पाठवण्यांत आलें होतें. जेव्हां जवाहर मसुरीला आला, तेव्हां सरकारला वाटलें कीं, या अफगाण माणसांना भेटून त्यांच्या देशाची आपल्या या स्वातंत्र्याच्या लढ्यामध्यें मदत मिळवण्याकरतां कॉंग्रेसनें त्याला येथें पाठवलें असलें पाहिजे.

एक दिवस एक पोलिस ऑफिसर या हॉटेलमध्यें आला व जवाहरनें चोवीस तासांच्याआंत मसुरी सोडली पाहिजे किंवा या अफगाणांशीं कुठल्याही तऱ्हेचा संबंध ठेवणार नाहीं, असें कबूल केलें पाहिजे, असें त्यानें जवाहरला सांगितलें.

सरकारच्या या कृतीचा जवाहरला या वेळीं फार अचंबा वाटला. कारण हा वेळ-पावेतों, या अफगाणांना तो भेटला तर नव्हताच, पण त्यांना नुसतें त्यानें पाहिलें देखील नव्हतें. हे अफगाण लोक जरी त्याच हॉटेलमध्यें राहात होते, तरी ते इतर लोकांबरोबर मुळींच मिसळत नसत. इतकेंच नव्हे, तर ते आपलें जेवणसुद्धां आपल्या खोल्यांमध्यें मागवीत. त्यांची भेट घ्यावी. असा जवाहरचाही मुळींच विचार नव्हता. पण त्यांच्याशीं संबंध ठेवणार नाहीं, अशी कबुली सरकारला देणें ही गोष्ट त्याला आवडणारी नव्हती. त्यामुळें तावडतोब मसुरी सोडून जाणें त्याला भाग पडलें. पण यानंतर लवकरच त्याच्या आईची प्रकृति जास्त बिघडली व त्यामुळें आपल्या वडिलांबरोबर त्याला पुनः मसुरीला जावें लागलें. तेथें जाण्याच्या बाबतींतला त्याच्यावरचा मनाई हुकूम रद्द करण्याचा सरकारनें या खेपेला शहाणपणा दाखवला होता.

अशा रीतीनें पुनः मसुरीला आल्यावर अगदीं पहिल्यांदा जवाहरला जी गोष्ट दिसली, ती ही कीं, त्याची तान्ही मुलगी इंदिरा, त्या अफगाणी गृहस्थांपैकीं एकाच्या कडेवर ! तो आश्चर्य-चकित झाला ! सरकारनें जवाहरला मसुरी सोडावयाला भाग पाडलें, ही बातमी वर्तमानपत्रांमध्यें वाचल्यावर ते अफगाण आपोआप नेहरू कुटुंबीयांबद्दल स्नेहभाव दाखवूं लागले, हें मग कमलेकडून त्याला कळलें. कमला व त्याची आई यांना ते फळें, फुलें पाठवूं लागले व छोट्या इंदिरेचेंही कौतुक करूं लागले. जवाहर व मोतीलाल यांनीं आतां या अफगाण्यांची भेट घेतली व त्यांनींही या पितापुत्रांना अफगाणिस्थानांत येण्याचें आस्थापूर्वक निमंत्रण दिलें.

जें सरकारला टाळावयाचें होतें, तेंच नेमकें अशा रीतीनें घडून यावें, ही एक मजेची गोष्ट नाहीं का, कुमकुम ?

आतां जवाहरच्या बाबतींत म्हणशील, तर त्याच्यावर मसुरीला बजावलेल्या या मनाई हुकुमामुळें वाईटांतून बरें निघावें, असें झालें. कसें तें ऐक.

मसुरी सोडून पहिल्यांदा जेव्हां जवाहरला परत अलाहाबादला जावें लागलें, तेव्हां तेथें रामचंद्र नांवाचा संयुक्त प्रांतांतल्या शेतकऱ्यांचा एक पुढारी आला होता, त्याच्याशीं जवाहरची ओळख झाली. आपल्या प्रांतांतल्या हजारों शेतकऱ्यांचे दुःख व हालअपेष्टा, हीं या रामचंद्रानें प्रत्यक्ष पाहिलीं होतीं. त्यामुळें या शेतकऱ्यांमध्यें त्यानें एकजूट घडवून आणली व त्यांना निष्ठुरपणें वागवणाऱ्या जमीनदारांबरोबर त्या सर्वांनीं लढा दिला पाहिजे, ही गोष्ट त्यानें त्यांना शिकवली. त्याच्या पुढारीपणाखालीं या शेतकऱ्यांचा मोर्चा आतां "सीताराम !" असा जयघोष करीत अलाहाबादला आला होता. कारण प्राचीनकाळच्या ज्या नामांकित अयोध्यानगरीमध्यें राम आपली गुणसंपन्न राणी सीता हिच्यासह राज्य करीत असे, त्या प्रांतामधले हे सर्व शेतकरी रहिवासी होते. हे शेतकरी अलाहाबादला आले असल्याबद्दलची बातमी कानांवर आल्यावर जवाहर व काँग्रेसमधले इतर लोक त्यांना भेटले व या शेतकऱ्यांची सर्व दुःस्थिति त्यांनी ऐकून घेतली. त्यांची करुण कहाणी ऐकल्यावर कोणाचें मन द्रवणार नाहीं ! कारण, कुमकुम, आपल्या देशांतील या शेतकऱ्यांइतकें कष्टाचें जिणें, दुसऱ्या कोणाचेंही नसेल !



या शेतकऱ्यांची ही वाईट स्थिति कळून येतांच त्यांच्या खेड्यांत जाऊन त्यांना मदत करण्याचें काम जवाहरनें लगेच हातीं घेतलें. आणि जून महिन्यामध्यें जेव्हां सूर्याचा ताप म्हणजे कांहीं विचारूं नका, अशा दिवसांत त्या शेतकऱ्यांबरोबर त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत व त्यांची दुःखमय परिस्थिती प्रत्यक्ष पाहात, तो बरेच दिवस गांवोगांव फिरला. आणि महात्माजींच्या शांततामय मार्गानें आपल्या शत्रूंबरोबर कसें लढावें, या गोष्टीची त्यानें या शेतकऱ्यांना शिकवणूक दिली. आणि आजपावेतों, नेहमी आपला उन्हाळा एखाद्या थंड हवेच्या ठिकाणीं आरामांत घालवणाऱ्या जवाहरला त्या वर्षी उन्हाळ्याच्या तापाचें मुळीं भानही नव्हतें, इतकें त्याचें मन या शेतकरी वर्गाच्या कार्यामध्यें तन्मय होऊन गेलें.

आणि मग यापुढें जवाहरनें आपलें सारें तनमन, ज्या चळवळीला पुढें 'किसानांची चळवळ' असें नांव मिळालें, तिला वाहिलें. या चळवळीमध्यें तो एवढा गुंतून राही कीं, आपल्या पत्नीच्या व तान्ह्या मुलीच्या सहवासांत घालवायला त्याला मुळीं वेळच मिळेनासा झाला. पण कमलेला या गोष्टीचें वाईट वाटत नसे. ती फार सुज्ञ होती. जवाहर एका उदात्त कार्यासाठीं खपत होता, याची तिला जाणीव होती.

# ७. तुरुंगवासाचा पहिला अनुभव


याच सुमारास प्रिन्स ऑफ वेल्स हे आपल्या देशाला भेट देणार आहेत, अशी बातमी प्रसिद्ध झाली. प्रिन्स ऑफ वेल्स म्हणजे कोण, हें तुला माहित आहे, का कुमकुम? इंग्लंडच्या राजाचा सर्वांत मोठा मुलगा, जो पुढें इंग्लंडच्या गादीवर येतो, त्याला प्रिन्स ऑफ वेल्स, असें म्हणतात.

या प्रिन्स ऑफ वेल्सला काळीं निशाणें दाखवावीं व त्याचें स्वागत करावयाला हा देश तयार नाहीं, याची त्याला जाणीव करून द्यावी, असें काँग्रेसच्या लोकांनीं यावेळीं ठरवलें. त्यामुळें सरकारनें अशा या लोकांपैकीं पुष्कळांना पकडलें. एक दिवस जवाहर आपल्या कचेरीमध्यें काम करीत बसला असतांना पोलिसांनीं येऊन घराला वेढा दिला व त्याला पकडून नेलें. नंतर त्यांनीं मोतीलाल नेहरू व इतर बरेच पुढारी यांनाही पकडलें. पण गांधीजीच्या वाटेला जावयाला मात्र या प्रसंगीं सरकारला धीर झाला नाहीं.

मोतीलाल व जवाहर यांना पकडून नेल्यावर मोतीलालना सहा महिन्यांची व जवाहरला तीन महिन्यांची सजा झाली. त्या दोघांनाही लखनौला तुरुंगामध्यें पाठवण्यांत आलें. आपल्याला तुरुंगवासाची शिक्षा मिळाली, याबद्दल जवाहरला फार उत्साह वाटला. कारण तुरुंगवासाचा हा त्याचा पहिलाच अनुभव होता. सुरवातीला तुरुंगांतील अधिकारी फारसा कडकपणा न दाखवतां त्यांना चांगल्या रीतीनें वागवूं लागले. जवाहर, त्याचे वडील व त्याचे

चुलत भाऊ यांना राहाण्याकरतां एक पडवी देण्यांत आली होती. त्यांच्या कुटुंबांतील माणसांना वारंवार तेथें येऊन त्याना भेटण्याचीही मुभा होती. तुरुंगांत जवाहर स्वतःला कोणत्याना कोणत्या कामामध्यें नेहमी गुंतवून ठेवी. सकाळच्या प्रहरीं तो पडवी झाडून काढी व स्वतःचे व आपल्या वडिलांचे कपडे धुई. चरख्यावर सूत काढण्यांतही तो कांहीं वेळ घालवी. दुपार उलटली कीं, ते सर्वजण थोडासा व्यायाम घडावा, म्हणून खेळ खेळत. तुरुंगांत कांहीं अशिक्षित कैदी होते, त्यांना शिकवण्याकरतां ते अभ्यासाचे वर्गही चालवीत. त्यांना वर्तमानपत्रें वाचावयाला परवानगी असल्यामुळें, या वर्तमानपत्रांवरून बाहेर चळवळ जोरांत चालली आहे, हें त्यांना कळे आणि मग ते सर्वजण एकत्र बसून पुढें काय करावयाचें, याची उत्साहानें चर्चा करीत.

ही चळवळ तहकूब करावी, असें गांधीजी बोलल्याचें, एक दिवस त्यांनीं वर्तमानपत्रामध्यें वाचलें व त्या सर्वांचें अवसान खचलें. गांधीजींनीं असें कां करावें,



हें त्यांना कळेना. पण गांधीजींच्या दृष्टीनें याला सबळ कारण होतें. संयुक्तप्रांतामध्यें चौरीचौरा येथें तेथल्या गांवकऱ्यांनीं एका पोलीसस्टेशनला आग लावली व त्या आगीमध्यें तेहत्तीस पोलीस लोक जळून मेले. गांधीजींनीं ज्यावेळीं ही बातमी ऐकली, तेव्हां ते म्हणाले, " स्वातंत्र्याहून अहिंसा ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे ! "

याच सुमारास जवाहरचे तुरुंगांतले तीन महिने संपले व त्याची सुटका झाली. अलाहाबादला पोहोंचतांच त्यानें आपल्या कार्याला पुन्हां सुरवात केली. तें पाहिल्यावर सरकारनें त्याला पुन्हां पकडलें व तुरुंगांत पाठवलें. पण या खेपेला ही तुरुंगाची सजा दीड वर्षाची होती. पुन्हां तो त्याच लखनौच्या तुरुंगांत आला. पण आतां या तुरुंगांतली स्थिति बदलली होती. त्याच्या वडिलांना येथून नैनितालच्या तुरुंगांत पाठवण्यांत आलें होतें व या तुरुंगांतला आयुष्क्रम आतां कंटाळवाणा व कष्टाचा झाला होता.

तुरुंगामध्यें दिवस संपून संपेना व रात्र तर त्याहूनही जास्त कंटाळवाणी व भयाण, अशी जवाहरची स्थिति झाली. पण जगांतल्या साध्यासुध्या गोष्टींपासूनही आनंदाचा कसा लाभ घ्यावा, हें त्याला माहित होतें. तुला माहित आहेच, कुमकुम, त्याला निसर्गाची फार आवड. त्यामुळें सांज झाली कीं, तो तुरुंगांत उताणा पडे व वर निळ्या आकाशाकडे पाहात किंवा पावसाळ्यामध्यें आकाशांत एकीकडून दुसरीकडे झुकणाऱ्या ढगांचे एकसारखे बदलणारे रंग पाहात, तो आपला वेळ घालवी. आणि उन्हाळ्यामध्यें रात्रीं वर चमकणारे सुंदर तारे त्याच्याकडे पाहून लुकलुक करीत, त्यांची त्याला सोबत होई. लवकरच या ताऱ्यांबरोबर

त्यानें मैत्री जोडली. दिवस मावळूं लागला कीं केव्हां एकदां आकाशांत हें आपले सोबती दिसूं लागतात, असें त्याला होई.

पण पुस्तकें वाचण्यांतही तो आपला बराचसा वेळ घालवी. जेव्हां जेव्हां त्याचें काय चाललें आहे, हें पाहाण्याकरतां तुरुंगावरचा अधिकारी त्याच्या कोठडींत येई, तेव्हां तेव्हां तो पुस्तक वाचण्यांत गढून गेला आहे, असें या अधिकाऱ्याला दिसून येई व याबद्दल तो मनांतल्या मनांत जवाहरवर जळफळे. कारण त्याला स्वतःला वाचतां येत नसे व त्यामुळें याबाबतींत त्याला जवाहरचा हेवा वाटे.

जवाहर या तुरुंगामध्यें असतांना तिकडे 'आनंद-भवना'मध्यें त्रासदायक गोष्टी घडूं लागल्या. पोलीसचे लोक वारंवार नेहरू कुटुंबातल्या माणसांना सरकारनें केलेला दंड वसूल करण्याकरतां म्हणून त्याच्या घरीं येत. अशा प्रकारचा दंड लोकांनीं भरूं नये, असें महात्माजींनीं सांगितलें होतें. म्हणून दर खेपेस हे पोलीस आले, म्हणजे या दंडादाखल 'आनंदभवन'मधलें फर्निचर जप्त करून नेत. छोटी इंदिरा या वेळीं चार वर्षांची होती. हे कोण अनोळखी लोक पुनः पुनः येऊन घरांत शिरतात व फर्निचर घेऊन चालावयाला लागतात, असें तिला वाटे. घरांतलीं माणसेंही गप्प राहून त्यांना असें करूं देतात, याबद्दल ती बुचकळ्यांत पडे!

यानंतर १९२३ च्या जानेवारीमध्यें एक दिवस जवाहरची तुरुंगांतून सुटका झाली.

तुरुंगाचा दरवाजा खुला होतांच जवाहरचें मन उचंबळून आलें. पुन्हां तो आतां स्वतंत्र माणूस झाला. पण त्याचें कार्य अजून अर्धवट राहिलें होतें. तें त्यानें पुन्हां हातीं घेतलें. इतर

कुठल्याही गोष्टीकडे लक्ष्य द्यावयाला त्याला आतां फुरसत नव्हती. देशाच्या स्वातंत्र्याकरतां मेहनत करण्यांत तो अष्टौप्रहर इतका गढून गेलेला असे कीं, स्वतःच्या चरितार्थाकरतां पैसे मिळवण्याचा कुठलाही उद्योग करावयाला त्याला वेळच मिळत नसे. त्यामुळें तो, त्याची पत्नी व त्याची मुलगी यांचा खर्च मोतीलाल जें कांहीं कमावीत, त्यांतून चाले. जवाहरच्या मनाला ही गोष्ट आतां जाचूं लागली. पण त्यानें जें कार्य हातीं घेतलें आहे, तें फार उदात्त आहे, त्यामुळें स्वतःच्या चरितार्थाकरतां निराळें काम करून पैसे मिळवले पाहिजेत, हा विचार त्यानें सोडून द्यावा, अशी मोतीलालनीं या बाबतींत त्याची समजूत पाडली. जवाहरनेंही मग, ज्यांत पुष्कळ पैसे मिळतील अशीं कामें त्याला सांगून आलीं असतांही, तीं पतकरण्याचें नाकारलें व मातृभूमीची सेवा करण्यांतच तो आपला सर्व वेळ खर्च करूं लागला.

यानंतर कांहीं महिन्यांनीं कमला आजारी पडली. ती आधींच प्रकृतीनें अशक्त व फार नाजूक. तशांत तिला हा आजार आलेला. सगळ्या डॉक्टरांनीं आतां असा सल्ला दिला कीं, तिनें दूरच्या स्वित्झर्लंड देशामध्यें जाऊन राहिलें पाहिजे. कारण त्या देशांतील डोंगरी प्रदेशामधली हवा अतिशय शुद्ध व ताजी. त्या हवेनेंच तिची प्रकृति सुधारेल, असें त्यांचें म्हणणें पडलें. त्यामुळें तिला व इंदिरेला घेऊन जवाहरला आतां स्वित्झर्लंडमध्यें जावें लागलें. त्याची बहीण विजयालक्ष्मी व तिचे पति, हें जोडपेंही त्याच्याबरोबर या वेळीं त्या देशांत गेलें. ही सर्व मंडळी स्वित्झर्लंडमध्यें एक वर्षभर राहिली. या अवधींत कमलेची प्रकृति हळूहळू सुधारली. मग जवाहर त्या सर्वांसह परत हिंदुस्थानांत आला.

यानंतर थोड्याच दिवसांत ब्रिटिश सरकारनें सात इंग्रज गृहस्थांना या आपल्या देशांत पाठवलें. येथल्या राज्यकारभारामध्यें काय सुधारणा करतां येईल, हें ठरवण्याकरतां त्यांना ब्रिटिश सरकारनें येथें पाठवलें होतें. पण ब्रिटिश लोकांवर येथली जनता इतकी रुष्ट झाली होती व तिचें मन ब्रिटिश सत्तेला इतकें विटलें होतें कीं, जेथें जेथें हे सात इंग्रज गेले, तेथें तेथें लोक एकत्र जमा होऊन त्यांना परत जा, असें सांगू लागले.

हे इंग्रज जेव्हां लखनौला आले, त्यावेळीं जवाहर त्या शहरांत होता. या इंग्रजांबद्दलची आपली नापसंती व्यक्त करण्याकरतां लखनौमधले लोकही अधीर झाले होते. हे लोक मोठ्या जमावानें येऊन या इंग्रजांना उद्देशून 'परत जा' असें ओरडूं लागले. जवाहर या लोकांच्या अग्रभागीं होता. घोड्यावर स्वार झालेल्या व पादचारी पोलीसांनीं यावेळीं या जमावावर लाठीमार केला. पण जवाहरनें या पोलीसांपुढें माघार घेतली नाहीं, किंवा त्यांच्या लाठ्या व सोटे पाहून त्यानें कच खाल्ली नाहीं. जरी त्या दिवशीं या लाठीमारामुळें पुष्कळ लोकांना जबर दुखापत झाली, तरी कुमकुम, याप्रसंगीं आपल्या लोकांनीं दाखवलेला निधडेपणा व शूरपणा म्हणजे आपला एक मोठा विजयच नव्हे का ?

# ८. काँग्रेसचा अध्यक्ष

यानंतर लवकरच जवाहरला एक वर्षभर काँग्रेसचा अध्यक्ष करण्यांत आलें. त्याच्या एवढ्या तरुण माणसाला मिळालेलें हें उच्च पद म्हणजे एक फारच मोठा मान होता.

काँग्रेसच्या लोकांनीं आपला पुढारी म्हणून जवाहरची निवड केली, यावरून त्यानें या देशाकरतां केलेलें कार्य त्यांना किती मोलाचें वाटे, हें दिसून येतें. येथून पुढें जवाहरचें नांव व कीर्ति हीं हिंदुस्थानमध्यें दाहीदिशांना पसरलीं व तो आपणां सर्वांचें जणूं दैवतच बनला. दूरदूरच्या शहरांतून व खेड्यांतून लोक त्याला पाहावयाला येऊं लागले व कितीतरी गीतें व काव्यें त्याच्यावर रचण्यांत आलीं. तुला असें वाटेल, कुमकुम, कीं, या सर्व गोष्टींमुळें जवाहर गर्वानें फुगून गेला असेल व त्याचा स्वभाव बिघडला असेल. पण सुदैवानें तसें झालें नाहीं. या बाबतींत त्याची घरची मंडळी त्याला चिडवूं लागली, म्हणजे तो फार आनंदित होई. 'भारतभूषण' 'त्यागमूर्ती' अशीं जीं नांवें लोकांनीं त्याला दिलीं होतीं, तीं उच्चारून नेहरू मंडळी घरीं त्याची नेहमी चेष्टा करीत. छोटी इंदिरासुद्धां त्याला चिडवण्याच्या या खेळामध्यें सामील होई.

या अवधींत इंदिरा हळूहळू वयानें वाढून आतां एक छान मुलगी दिसूं लागली होती. जवाहर आपल्या सार्वजनिक कार्यामध्यें इतका गुंतलेला असे कीं, या आपल्या लाडक्या मुलीच्या संगतींत घालवायला त्याला मुळीं वेळच मिळेना. पण जेव्हां जेव्हां त्याला थोडीशी



२० ... वा ...
नों. दि ...
... कालं

फुरसत मिळे, तेव्हां तेव्हां तिच्याशीं गोष्टी करण्यांत तो वेळ घालवी व मग इंदिराही अनेक विषयासंबंधीं त्याला प्रश्न विचारी. त्यावर्षीं इंदिरा आपल्या आईबरोबर उन्हाळ्यांतले दिवस घालवण्याकरतां मसुरीच्या थंड हवेंत गेली. तिच्याबरोबर आपल्याला आतां नेहमी प्रमाणें गुजगोष्टी करतां येत नाहींत, असें पाहिल्यावर जवाहरनें तिला मोठमोठीं पत्रें पाठवण्याचा क्रम सुरू केला. कारण इंदिरेला आतां लिहितां वाचतां येऊं लागलें होतें. या पत्रांमधून तिला त्यानें या पृथ्वीसंबंधींची अगदीं आरंभापासूनची गोष्ट कथन केली. त्यांतील एका पत्रामध्यें तो इंदिरेला लिहितो, 'या पत्रांमधून तुला जें ज्ञान मिळेल, तें फारच थोडें आहे, पण मला अशी आशा आहे कीं, तें थोडेंसें ज्ञानसुद्धां या सबंध जगासंबंधीं तुझ्या मनांत उत्सुकता उत्पन्न करील व जगाच्या या निरनिराळ्या भागामध्यें राहाणारीं सर्व माणसें म्हणजे आपले बंधुभगिनी आहेत, असें तुला वाटावयाला लावील.'

तुला आठवत असेलच, नेहरूमंडळी अलाहाबादला 'आनंद–भवन' नांवाच्या त्या सुंदर घरामध्यें राहात असत. हें घर कॉंग्रेसला द्यावें व त्याचें नांव 'स्वराज्य–भवन' असें ठेवावें, असें मोतीलालनीं आतां ठरवलें. या 'स्वराज्य–भवना'ला लागून स्वतःच्या कुटुंबाला राहाण्याकरतां त्यांनीं त्याहून लहान असें एक नवें घर बांधलें व त्याला 'आनंद–भवन' असें नांव दिलें.

यानंतर कांहीं काळ लोटला व १९३० साल आलें. गांधीजी आतां दुसरी एक मोठी चळवळ सुरू करणार, असें दिसूं लागलें. पूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्वस्थ राहावयाचें नाहीं,

असें कॉंग्रेसनें ठरवलेंच होतें. सबंध देशभर कॉंग्रेसचे सभासद या नव्या चळवळीची आतां तयारी करूं लागले. हिंसा व शारीरिक बळ यांचा उपयोग न करतां सरकारला कसा प्रतिकार करावयाचा हें त्यांनी लोकांना शिकवले. याच वेळीं पहिल्यांदा हिन्दुस्थानांतील स्त्रिया फार मोठ्या संख्येनें देशकार्यामध्यें भाग घेण्याकरतां पुढें आल्या व या स्वातंत्र्याच्या लढ्यांत सामील झाल्या. या लढ्यांत ज्या स्त्रियांनीं भाग घेतला, त्यांत कमला, जवाहरची आई व त्याच्या दोन बहीणी या होत्या.

लोकांची ही जंगी तयारी पाहिल्यावर सरकारनें गांधीजी व जवाहर यांना पकडून तुरुंगांत घातलें.

या खेपेला जवाहरला तुरुंगांत एकाकीं स्थितींत एका कोठडींत ठेवण्यांत आलें. कारण सरकारला जवाहरची आतां भीति वाटूं लागली होती व त्यामुळें त्याला इतर सर्व कैद्यांपासून अलग ठेवण्याचें सरकारनें ठरवलें होतें.

ते उन्हाळ्याचे दिवस होते. तुरुंगांतल्या या लहानशा कोठडींत फार उकाडा होई व तेथें राहाणें हें फार कष्टप्रद होतें. रात्रींच्या वेळीं या कोठडीसमोरच्या अंगणांत झोंपण्याची जवाहरला परवानगी होती. खाटेचा उपयोग करून तो तुरुंगाच्या भिंतीवर चढेल व निसटेल, म्हणून त्याची ही खाट रात्रीं सांखळदंडानें जमिनीला जखडून ठेवण्यांत येई. अशा रीतीनें जवाहरचा एक सबंध महिना या तुरुंगामध्यें एकाकी स्थितींत गेला. या दिवसांत त्याला फारच ओकें ओकें वाटे व त्याचें मन उदास होई. कुमकुम, बोलायला खेळायला कोणीही जवळ नाहीं,

अशा स्थितींत तुला जर एखाद्या कुलुपबंद कोठडींत एकटेंच राहावें लागलें, तर तुझेंही मन किती कष्टी होईल, याची कल्पना कर !



पण जवाहरनें या एकाकी स्थितींतही, त्या कोठडीमध्यें नवीन मित्र जोडावयाला सुरवात केली. हे त्याचे मित्र म्हणजे त्या तुरुंगांतले पशुपक्षी. बरेचसे पोपट त्याच्या या कोठडीनजिक राहात असत. लवकरच जवाहरनें त्या सर्वांशीं ओळख करून घेतली. त्या सर्वांमध्यें मिठ्ठू या पोपटाबरोबर त्याची विशेष दोस्ती जमली. या मिठ्ठूचें मुन्नी नांवाच्या एका पोपटीणीवर प्रेम जडलें होतें. त्याला तिच्याबरोबर लग्न करावयाचें होतें. पण मुन्नी इतकी लाजाळू होती कीं, बरेच दिवस ती या गोष्टीला मुळीं होकारच देईना. मिठ्ठूचें

मन मुन्नीवर गेलें आहे, हें जवाहरला माहीत होतें. कारण मिठू आपल्या मनांतल्या सर्व गोष्टी त्याला सांगे. मुन्नीला कोणत्या प्रकारें वश करून घ्यावें, याबद्दल ते दोघेही आतां डोकें खाजवूं लागले. कांहीं दिवसांनीं मुन्नी थोडीशी वळणावर आली व मिठूचें मनोगत आतां साधणार, असा रंग दिसूं लागला. इतक्यांत एक धीट व चलाख पोपट लल्लू यानें मुन्नीशीं लाडीगोडी करावयाला सुरवात केली. आणि मुन्नीही त्याच्या रूपावर भाळली व तिच्यावर प्रेम करणाऱ्या मिठूला विसरून गेली. ती आतां लल्लूबरोबर दिवसभर नाचूं बागडूं लागली. बिचाऱ्या मिठूचें दुःख आतां काय विचारणार ? जसजसे दिवस लोटूं लागले, तसतसा झुरणीला लागलेला मिठू अगदीं खंगून गेला व आजाऱ्यासारखा दिसूं लागला. आपल्या मित्राची ही स्थिति पाहून जवाहर फार काळजींत पडला. शेवटीं एक दिवस मिठूच्या घरट्याजवळ जाऊन त्याच्या पाठीवरून हात फिरवीत तो त्याला म्हणाला, " गड्या, तूं असा हातपाय गाळून स्वस्थ काय बसला आहेस ? मर्दासारखा जा व त्या लल्लूशीं झुंज खेळून आपल्या मुन्नीला परत मिळव ! "

जवाहरचे हे शब्द ऐकल्यावर मिठूच्या अंगांत जणूं नवीन बळ संचारलें. मोठ्या आवेशानें फडफड पंख हलवीत व वेगानें उडत लल्लूच्या घरट्याजवळ त्यानें झेंप घेतली व लल्लूला त्यानें चोंच-नख झुंजीचें आव्हान दिलें. यावेळीं मिठूच्या डोळ्यांमध्यें चमकणारा तो त्वेष पाहिल्यावर लल्लूचें अवसान खचलें. पण मिठूनें आव्हान दिलें असल्यामुळें

त्याच्याबरोबर लढणें लल्लूला आतां टाळतां येईना. त्यांच्या या झुंजीची मग एक वेळ ठरविण्यांत आली. आजूबाजूच्या सर्व पोपटांना ही बातमी कळतांच त्यांच्यामध्यें खळबळ उडाली व त्यांचा एकसारखा कोलाहल सुरू झाला. मुन्नी तर आपल्या प्रेमाकरतां मिठ्ठू व लल्लू हे झुंज खेळताहेत, हें पाहिल्यावर इतकी हुरळून गेली कीं, कांहीं विचारूं नका ! प्राचीन काळीं एखाद्या सुंदर राजकन्येवर दोघां वीरांचें प्रेम जडलें, तर ते वीर द्वंद्वयुद्ध खेळत व त्यांत जो वीर विजयी होई, त्याच्या गळ्यांत मग ती राजकन्या विवाहाची माळ घाली. प्राचीन काळच्या अशा या गोष्टी यावेळीं मुन्नीला आठवल्या व आपण म्हणजे अशी एक सौंदर्यशालिनी राजकन्याच आहे, असें तिला आतां वाटलें व जुन्या काळच्या त्या रिवाजाप्रमाणें आपणही, मिठ्ठू व लल्लू या वीरांपैकीं जो कोणी या झुंजीमध्यें विजयी होईल, त्याला वरावें, असें तिनें ठरवलें. स्वतःच्या बडेजावीच्या कल्पनेनें बेहोष होऊन झाडाच्या या फांदीवरून त्या फांदीवर नाचत बागडत ती आतां उत्कंठेनें या झुंजाची वाट पाहूं लागली.

ठरलेल्या वेळीं सर्वजण ही झुंज पाहाण्याकरतां अंगणांत जमा झाले. मिठ्ठू व लल्लू मध्यभागीं इषाऱ्याची वाट पाहात खडे होते. इषारा दिला जातांच दोघांनीही हवेंत उड्डाण केलें व नंतर ते एकमेकांवर झडप घालूं लागले. थोड्याच अवकाशांत त्यांची चांगलीच जुंपली व आपापल्या चोंचीचे व नखांचे ते एकमेकांवर जोराचे तडाखे देऊं लागले. मिठ्ठू पुढें आपला टिकाव लागणार नाहीं, हें लल्लूला लवकरच कळून आलें. कारण मुन्नीवर मिठ्ठूचें

इतकें गाढ प्रेम होतें कीं, त्या प्रेमामुळेंच त्याच्या अंगीं यावेळीं जणूं दहा जणांचें बळ संचारलें होतें. आजवर कुठलाही पोपट लढला नव्हता, इतक्या निकरानें मिठ्ठू लढत होता. शेवटीं जेव्हां लल्लू त्याच्या पायांशीं लोळण घेऊन त्याला शरण आला, तेव्हांच त्याच्या अंगांतला आवेश ओसरला. इतर सगळ्या पोपटांनीं आतां टाळ्या वाजवल्या व ते आनंदानें ओरडले, " शाबास, शाबास मिठ्ठू ! " इतकें झाल्यावर बोहल्यावर चढणाऱ्या वधूप्रमाणें मुन्नी लाजत लाजत पुढें आली व मिठ्ठूच्या हातांत हात घालून त्याला म्हणाली, " मिठ्ठू, माझ्या प्रियकरा मी आतां सर्वस्वी तुझी आहें ! " आणि मग मिठ्ठूनेंही प्रेमभरानें तिला गोंजारलें व आपल्या या नववधूला घेऊन त्यानें आपल्या घरट्यामध्यें प्रवेश केला. जवाहरच्या कोठडीनजिक असलेल्या या घरट्यामध्यें यापुढें मिठ्ठू व मुन्नी हीं सुखानें कालक्रमणा करूं लागलीं. जवाहर मधून मधून मिठ्ठूच्या या घरट्याजवळ जाई व आपल्या या मित्राबरोबर गुजगोष्टी करण्यांत तो आपला वेळ घालवी.

या तुरुंगांत एक गिलहरी नांवाची एक खारही होती. ती फार लाजरी होती व दुसऱ्याशीं मैत्री जोडण्याच्या बाबतींत ती जरा मागें असे. आपल्या कोठडींत बसून पुस्तक वाचीत असलेल्या ज़वाहरला ती बरेच दिवस पाहात आली होती. पुस्तक वाचण्यांत गढून गेलेल्या जवाहरची तासचेतास यत्किंचितही हालचाल होत नसे. त्यामुळें तो मनुष्य आहे कीं, झाड आहे, हें गिलहरीला समजेना ! एक दिवस तिनें या गोष्टीची शहानिशा करून घेण्याचें

ठरवलें. ती हळूच त्याच्या पायांवर उडी मारून त्याच्या मांडीवर येऊन बसली. तिच्याकडे



लक्ष्य जातांच जवाहरनें तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून हात फिरवला. पण त्यामुळें गिलहरी फार घाबरली व एक गिरकी मारून ती जी पळाली, ती दूर दिसेनाशी झाली.

यानंतर जवाहर तिच्यासाठीं तिच्या येण्याजाण्याच्या वाटेवर फळें ठेवून देऊं लागला. सुरवातीला हीं फळें तीं आपल्या घरट्यांत नेत असे व तेथें तीं खात असे. पण पुढें कांहीं दिवसांनीं ती धीट झाली व जवाहरनें पुस्तक वाचण्याचें मिष केलें, म्हणजे ती तेथेंच बसे व तीं फळें खाई. यानंतर जवाहरबरोबर तिच्या गुजगोष्टीसुद्धां होऊं लागल्या. हा प्रकार सुरू झाला तो असा.

एक दिवस गिलहरी जरा खुषींत आली. त्या दिवशीं उकाडा जरा कमी होता किंवा तिला त्या दिवशीं मिळालेलीं सुकीं फळें रोजच्याहून जरा जास्त चवदार होतीं, हें त्याचें कारण असेल. कांहींही असो, गिलहरीनें अचानक जवाहरशीं बोलावयाला सुरवात केली. ती म्हणाली, "आज हवेमध्यें छान गारवा आहे, नाहीं का ?" "होय, आजची हवा खरोखरच छान आहे !" पुस्तक वाचण्याचें सोंग करण्याकरतां पुस्तकावर खिळवलेली आपली नजर तिच्याकडे वळवून जवाहरनें उत्तर दिलें व तें अशा आविर्भावानें कीं, गिलहरी आपल्याशीं बातचीत करूं लागली, या गोष्टीचें त्याला मुळींच नवल वाटलेलें नाहीं.

"तुझा साराच प्रकार और दिसतो, गड्या !" फळाचा एक तुकडा कुरतडून घेत गिलहरी पुन: म्हणाली, "आजची ही हवा किती छान आहे ! अशा दिवशीं कुणी का, दिवसभर उंबरठ्याच्या आंत अशी बैठक मारून बसेल ? तुझ्याजागीं मी असतें, तर या वेळीं त्या पलीकडच्या माळरानामध्यें मजेंत दूर हिंडावयाला गेलें असतें !"

जवाहर किंचित् हंसून खिन्नपणें बोलला, "मी तसें करूं शकत नाहीं, गिलहरी."

फळ कुरतडीत असतांनाच गिलहरीनें किंचित् मान वर करून विचारलें, "कां बरें?"

"तुला माहित आहे का, मी एक कैदी आहे. मला येथें दरवाजा बंद करून ठेवलें आहे."

यावर गिलहरीनें चकित होऊन फळ तोंडापासून बाजूला सारलें व ती साशंक मुद्रेनें त्याच्या चेहऱ्याकडे पाहूं लागली.

"कोणी तुला येथें दरवाजा बंद करून ठेवलें आहे व तें कां?" कांहीं मिनिटांनीं तिनें प्रश्न केला. हिंदुस्थान देश कसा स्वातंत्र्याकरतां लढत आहे व या थोर कार्याला आपण स्वत:ला कसें वाहून घेतलें आहे, ही सर्व कहाणी मग जवाहरनें गिलहरीला कथन केली. आपली लहानगी मुलगी इंदिरा व कुटुंबांतलीं इतर माणसें यांची हकीगतही त्यानें तिला सांगितली. ती ऐकल्यावर इंदिरेला भेटण्याकरतां गिलहरी उत्सुक झाली. कारण तिला मोठ्या वयाच्या माणसांपेक्षां लहान मुलांची संगतच जास्ती आवडत असे.

जवाहर हें जें सर्व सांगत होता, तें गिलहरी चित्त लावून ऐकत होती. त्याचें सर्व बोलणें ऐकून घेतल्यावर अखेरीस ती म्हणाली, "खरेंच, तूं एक छान माणूस आहेस. तुझ्याशीं मी यापुढें नेहमी दोस्ती ठेवीन!" आणि ही अशा रीतीनें जवाहर व गिलहरी यांच्यामध्यें मैत्री जुळून आली.

जवाहरचे तुरुंगामध्यें हे असे दिवस चालले असतांना बाहेर कॉंग्रेस आपलें काम ईर्षेनें पुढें रेटीत होती. सरकारनें शेवटीं कॉंग्रेस ही बेकायदेशीर संस्था आहे, असें जाहीर करून आणखी बऱ्याच लोकांना पकडलें. त्यांत मोतीलाल नेहरू हे एक होते. तुरुंगामध्यें

जास्त जागा नसल्यामुळें मोतीलाल व आणखी दोघे कैदी यांना जवाहरच्याच कोठडीमध्यें पाठवण्यांत आलें. आपल्या वडिलांबरोबर राहावयाला मिळालें, याबद्दल जवाहरला आनंद वाटला. शिवाय मोतीलालची तब्येत ठीक नव्हती. त्यांच्या प्रकृतीची आपल्याला काळजी घेतां येईल, म्हणूनही त्याला समाधान वाटलें. पण जवाहर अत्यंत आस्थेनें काळजी घेत असतांही मोतीलालची प्रकृति या तुरुंगांत अधिकच बिघडली व सरकारला त्यांची सुटका करावी लागली.

मोतीलाल गेल्यावर जवाहर पुनः त्या भकास कोठडीमध्यें एकाकी स्थितींत दिवस कंठू लागला. मिठ्ठू, गिलहरी हे त्याचे मित्र त्याचें सांत्वन करावयाला तेथें होते. पण आपल्या वडिलांच्या सहवासाला मुकल्यामुळें ती कोठडी त्याला आतां भयाण वाटूं लागली.

अखेरीस त्याच्या शिक्षेचे सहा महिने संपले व तुरुंगांतून त्याची सुटका झाली. गिलहरी व मिठ्ठू हे त्याच्या संगतीला आतां मुकणार होते. पण तो तुरुंगांतून सुटून आपल्या घरच्या मंडळींमध्यें आतां जाणार म्हणून त्यांना एकप्रकारें समाधान वाटलें. ज्या दिवशीं जवाहरला तुरुंगांतून सोडण्यांत आलें, त्या दिवशीं ही सर्व मित्रमंडळी जमा झाली व त्यांनीं त्याला प्रेमानें निरोप दिला.

जवाहर तुरुंगांतून बाहेरच्या जगांत आला, पण फारच थोडे दिवस! अवघ्या आठ दिवसांच्या आंत त्याला पुनः पकडण्यांत आलें व पुनः त्याची तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. जवाहर परत त्याच कोठडींत आला व पाहातो, तर त्याचे पूर्वींचे संवगडी मिठ्ठू व

गिलहरी, हे तेथें नाहींत ! तो पुनः लवकर परत येणार नाहीं, असें वाटून तीं दोघेंही ती जागा सोडून गेलीं होतीं. पण जवाहरचे मेहुणे रणजित पंडित व इतर दोघे कैदी अजून तेथें होते. रणजितला फुलांची व बागेची फार आवड होती. त्यानें लवकरच कोठडीबाहेर एक लहानशी छानदार बाग तयार केली. या बागेंतल्या टवटवीत रंगीबेरंगी फुलांमुळें त्या कोठडींतल्या कैद्यांच्या जीवनामध्यें कितीतरी उल्हासितपणा आला. त्यांच्या त्या चिमुकल्या बागेमधले ते सोनेरी सूर्यकिरण, गवताच्या पात्यांचा शोभून दिसणारा तिथला हिरवा रंग, व तिथलीं तीं मोहक फुलें, ही सारी शोभा, जगामधल्या दुसऱ्या कुठल्याही बागेंत नसेल, असेंच जणूं त्या सर्वांना आतां वाटूं लागलें.

१९३१ सालचें नवीन वर्ष सुरू झालें. या वर्षारंभाच्या दिवशीं कमलेला पकडण्यांत आलें. जवाहरला जेव्हां ही बातमी कळली, तेव्हां कमलेविषयींच्या प्रेमाच्या व कौतुकाच्या भावनेनें त्याचें अंत:करण उचंबळून आलें. कारण जवाहरच्या या तुरुंगवासाच्या दिवसांत ती बाहेर एकसारखी काँग्रेसकरतां खपत होती. धैर्य व स्वार्थत्याग या आपल्या गुणांमुळें सर्व देशाचें प्रेम व आदर हीं तिनें संपादन केली होती. जेव्हां पोलीस तिला पकडून न्यावयाला आले, तेव्हां तिच्या तोंडून उद्गार निघाले, "माझ्या पतीचा मार्ग अनुसरण्यांत मला सुख व अभिमान वाटतो. माझे देशबांधव स्वातंत्र्याचें निशाण असेंच उंच फडकावीत ठेवतील, अशी मला आशा आहे !" असे शूरपणाचे शब्द उच्चारून ती खुषीनें तुरुंगांत गेली.

पण कमला फक्त सव्वीस दिवसच तुरुंगांत होती. मोतीलालचें दुखणें विकोपाला गेलें

व या दुखण्यांतून ते निभावतील, अशी आशा राहिली नाहीं. अशा प्रसंगीं जवाहर व कमला त्यांच्याजवळ असावीं, म्हणून त्या दोघांनाही यावेळीं तुरुंगांतून सोडण्यांत आलें. जवाहर आतां आपल्या वडिलांची प्रेमानें शुश्रूषा करीत सर्व वेळ त्यांच्या बिछान्याशीं बसून राहूं लागला. मोतीलाल अत्यवस्थ आहेत, हें कळतांच गांधीजीही यावेळीं त्यांच्या भेटीकरतां अलाहाबादला आले. मृत्यूची घटका जवळ आली, तेव्हां मोतीलाल गांधीजींना म्हणाले, " महात्माजी, मी चाललों. स्वराज्य येईल, तेव्हां तें पाहावयाला मी येथें नसणार. पण तुम्ही तें जिंकलें आहे व लवकरच तुम्ही तें प्रत्यक्ष मिळवून दाखवाल ! "

मोतीलालचा मृत्यू म्हणजे आपल्या या देशाची फारच मोठी हानी होती. त्यांच्या मृत्यूमुळें सबंध देशावर शोकाची छाया पसरली. सर्व लोक जवाहरच्या या दुःखामध्यें त्याचे सहभागी झाले !

# ९. हिमालयाच्या पायथ्याशीं

या नंतर एक वर्ष निघून गेलें. या अवधींत जवाहर अहोरात्र हिंदुस्थानच्या स्वातंत्र्या-करतां खपत होता. सर्व देशभर प्रवास करून स्वातंत्र्याचा लढा कसा चालवावा, हें लोकांना समजावून सांगण्याचें त्याचें काम एकसारखें चाललें होतें. १९३२ मध्यें सरकारनें पुन: कॉंग्रेस ही बेकायदेशीर संस्था असें जाहीर केलें व नंतर जवाहर व आणखी बरेच पुढारी यांना अटक केली.

कायदेभंग करणाऱ्या लोकांनीं आतां तुरुंग भरून गेले. 'स्वराज्य-भवनाचा' सरकारनें ताबा घेतला. जवाहरची आई व दोघी बहीणी यांनीं या चळवळींत भाग घेतला होता. त्याच्या बहीणींना पकडून सरकारनें तुरुंगांत टाकलें. जवाहरच्या आईनें एका मोठ्या मिरवणुकीमध्यें पुढाकार घेतला, तेव्हां या मिरवणुकीवर पोलिसांनीं लाठी चालवली व इतर लोकांबरोबर तिलाही या लाठीमारामुळें बरीच दुखापत झाली. हा सर्व काळ कमला एक प्रकारच्या बारीक तापाशीं झगडत बिछान्यावर पडून होती. या तिच्या आजारामुळें तिला या चळवळींत भाग घेतां आला नाहीं. पण ती व जवाहरची आई तुरुंगांत जाऊन जवाहरला भेटत. त्यांच्या या भेटी म्हणजे त्या तिघांच्याही मनाला एक फार मोठा विरंगुळा होता. पण एकदां तुरुंगांतल्या एका अधिकाऱ्यानें जवाहरच्या पत्नीचा व आईचा अपमान केला. त्यांचा असा अपमान होऊं देण्यापेक्षां या भेटीच बंद केलेल्या बऱ्या, असें जवाहरनें यानंतर ठरवलें.

हा एक त्याचा मोठाच त्याग होता. कारण त्या दोघींनाही भेटण्याकरतां तो नेहमी आतुर झालेला असे. पण यापुढें त्या दोघींनीं पाठवलेलीं पत्रें मात्र त्याला मिळूं लागलीं. ही पत्रेंसुद्धां जर त्याला मिळालीं नसतीं तर बाहेरच्या जगाशीं त्याचा संबंध अजिबात राहिला नसता.

शिवाय त्याचीं नेहमीचीं पुस्तकेंही तुरुंगांतला तो उबग कमी करावयाला कारण होत. सर्व पुस्तकांमध्यें त्याला प्रवासवर्णनांचीं व नकाशांचीं पुस्तकें जास्त आवडत. हीं पुस्तकें, त्यानें स्वत: जेथें जेथें प्रवास केला होता अशीं ठिकाणें व त्या त्या ठिकाणीं त्यानें अनुभवलेल्या गोष्टी, यांची त्याला आठवण करून देत व त्यामुळें त्याच्या मनाची एवढी करमणूक होई कीं, आपण एक कैदी आहें, ही गोष्ट तो विसरून जाई. जर्मन भाषा शिकावी, असें त्याला फार दिवसांपासून वाटत होतें. त्या भाषेचा अभ्यासही त्यानें आतां सुरू केला.


कांहीं दिवसांनीं हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या डेहराडूनच्या तुरुंगांत त्याला पाठवण्यांत आलें. एक दिवस गुप्तपणें मोटारींतून येथें त्याला नेण्यांत आलें. या मोटारींत बसत असतांना एका पोलीस अधिकाऱ्यानें जुन्या जर्मन मासिकांचें एक पुडकें जवाहरच्या हातीं दिलें. जवाहर जर्मन भाषा शिकत आहे, हें या अधिकाऱ्यानें ऐकलें होतें. जवाहरला उपयोगी पडण्याकरतां त्यानें केलेल्या या गोष्टीमुळें जवाहरच्या मनाला चटका लागल्यावांचून राहिला नाहीं.

डेहराडूनच्या या तुरुंगांतील लहानशा खिडकीमधून जवाहरला बाहेरचे डोंगर दिसत असत. उन्हाळ्याच्या दिवसांत हे डोंगर हिरवा, तजेलदार रंग धारण करीत, तर हिंवाळ्यामध्यें

त्यांच्यावर बर्फाचें पांघरूण चढे व त्यांचें रूप अगदीं बदलून जाई. या डोंगरांकडे टक लावून बसल्यावर नाना प्रकारच्या कल्पना जवाहरच्या मनांत येऊन



जात. आपण त्या डोंगरांच्या शिखरांवर चढत आहें; तें शिखर गांठल्यावर त्या शिखरांच्या बाजूला थारावलेल्या एखाद्या चिमुकल्या ढगावर आपण आरोहण केलें आहे; आणि मग त्या ढगा-






बरोबर आकाशांत वर वर जात, इतक्या उंच ठिकाणीं आपण पोहोंचलों आहें कीं, तेथून खालची ही पृथ्वी एखाद्या लहानशा चेंडूएवढी दिसत आहे; अशा प्रकारच्या कल्पनातरंगांमध्यें तो स्वतःला विसरून जाई.

अशा रीतीनें महिन्यांमागून महिने जाऊं लागले. जवाहरला आतां एक नवीन गोष्ट कळून आली कीं, ती ही कीं, तो येथें एकटा नसून त्याच्या सोबतीला आणखी बरेच प्राणी तेथें आहेत. हे प्राणी म्हणजे मुंग्या, माशा व गांधिलमाशा. मुंग्यांची भिंतीवर वर खालीं सरपटत एका रांगेमध्यें एकसारखी ये जा चाललेली असे. दिवसभर त्यांचा हा असा काय उद्योग चाललेला असे, याचा जवाहरला कधींच उमज पडला नाहीं. माशांबद्दल म्हणाल, तर त्या फार त्रासदायक होत्या. दुपारच्या वेळीं तर त्यांना अधिकच चेव येई व जवाहर वामकुक्षीकरतां बिछान्यावर जरा पहुडतो, तोंच त्यांच्यापैकीं एखादी येऊन त्याच्या नाकाच्या शेंड्यावर बसे व त्याला डिंवची. गांधिलमाशांनीं स्वतःकरतां तक्तपोशीच्या एका कोंपऱ्यामध्यें एक लहानसें घरटें केलें होतें. त्या नेहमी त्याच्यापासून दूर राहात व त्याच्याकडे थोडेंही लक्ष्य देत नसत. पण त्यांच्यामध्यें 'बदमिजास' नांवाची जी एक गांधिलमाशी होती, तिनें एकदा जवाहरला आपली चांगलीच करामत दाखवली. तो सोमवारचा दिवस होता. दर सोमवारीं पोळें साफसूफ करण्याची पाळी या बदमिजासवर येई. गांधिलमाशा साधारणपणें फार उद्योगी असतात, पण ही बदमिजास फार आळशी होती, त्यामुळें सोमवारचा दिवस तिला मुळींच आवडत नसे. या सोमवारीं तर तिच्या अंगांत जास्तीच आळस आला होता व

तिची मिजास विघडून तिचा दुष्ट-पणा वाढला होता. "आज मी कांहींतरी दुष्ट गोष्ट केली पाहिजे, नाहींतर मला बरें वाटणार नाहीं !" असें तिला एकसारखें त्या दिवशीं वाटत होतें. कोठडीमध्यें एक मोठा, उंच, मनुष्य राहात असतो, हें मग तिला आठवलें. मग ती जी गूं गूं करीत उडाली ती तडक जवाहरजवळ जाऊन त्याच्या हाताला कडकडून डसली. अरेच्या ! केवढी कळ आली ! बदमिजासला आतां आनंदानें हंसूं फुटलें !



"छान ! आतां मला किती बरें वाटलें ! आतां लागतें मी माझ्या साफसुफीच्या कामाला !" ती खुषींत येऊन म्हणाली व मग भर्रकन् उडून गेली व जवाहर येथें आपल्या हाताला उपचार करीत बसला. दुसऱ्याला निष्कारण उपद्रव देण्याची व भांडकुदळपणाची बदमिजासची ही खोड पाहिल्यावर जवाहरनें त्या सर्व गांधिलमाशांना त्या कोठडींतून हांकून लावावें, असा निश्चय केला. पण एका बदमिजासच्या खट्याळपणाकरतां त्या सर्व

गांधीलमाशा एवढा मोठा भुर्दंड स्वतः भरावयाला तयार नव्हत्या. त्यानीं ती कोठडी सोडून जावयाला साफ नकार दिला. त्यांना बाहेर हुसकावून लावणें शक्य नाहीं, असें पाहिल्यांवर उभयपक्षांनीं एकमेकांच्या वाटेला जावयाचें नाहीं अशी जवाहरनें त्यांच्याशीं तडजोड केली. या तडजोडीप्रमाणें जवाहरनें कोठडीच्या एका भागांत व गांधिलमाशांनीं दुसऱ्या भागांत राहावें व एकमेकांच्या व्यवहाराआड येऊं नये, असें ठरलें. पण बदमिजासला त्याच्या या वाईट वर्तनाबद्दल इतर गांधिलमाशांकडून कडक शिक्षा झाल्यावांचून राहिली नाहीं. शिक्षेदाखल तिला सबंध आठवडाभर आंतून बाहेरून पोळें साफ करण्याचें काम देण्यांत आलें.


यानंतर एक दिवस भल्या पहांटेस कोठडीबाहेर कोणीतरी किंचाळत असल्याचा आवाज जवाहरच्या कानांवर आला व तो फार लवकर जागा झाला. बिछान्यावरून उठून बाहेर जाऊन तो पाहूं लागला, तों नुकतींच जन्माला आलेलीं तीन कुत्र्याचीं पिलें गटारांत ठेवण्यांत आलेलीं त्याला दिसलीं. तीं थंडीनें इतकीं गारठलेलीं व भुकेलेलीं होतीं कीं, जवाहरनें त्यांना आपल्या कोठडींत आणून त्यांना दूध प्यावयाला दिलें व आपली रजई त्यांच्यावर पांघरली.

जेलर रोजच्याप्रमाणें आला व तीं पिलें पाहिल्यावर त्यांना तो तेथून घेऊन जाऊं लागला. कारण कैद्यांना पशुपक्षी पाळण्याची परवानगी नव्हती. पण यावेळीं जेलरलासुद्धां या पिलांची कींव आली. आणि जेव्हां जवाहरनें त्यांना आपल्या कोठडींत राहूं द्यावें, असें त्याला सांगितलें, तेव्हां त्यानें या गोष्टीला कबुली दिली. अशा रीतीनें हीं कुत्र्यांचीं

पिलें यापुढें जवाहरबरोबर त्याच्या कोठडींत राहूं लागलीं. त्यांच्यापैकीं एकाचें जवाहरनें, 'चंचल' असें नांव ठेवलें. कारण हें पिलूं सर्व वेळ इकडून तिकडे नाचत बागडत असे. दुसरें जें पिलूं फारच खोडकर होतें, त्याचें नांव त्यानें 'नटखट' असें ठेवलें आणि तिसऱ्याला तो 'खुषी' या नांवानें हांक मारूं लागला, कारण तें फारच आनंदी वृत्तीचें होते. हीं तिन्ही पिलें आतां जवाहरच्या जेवणामध्यें भागीदार होऊं लागलीं. लवकरच तीं वाढून चांगलीं धष्टपुष्ट झालीं. पण एक दिवस फार चौकस व चळवळ्या असा जो चंचल त्याला, कोठडीमध्येंच नाचण्या-बागडण्यापेक्षां, कोठडीच्या चार भिंतीपलीकडे कशा प्रकारचें जग आहे, हें जाऊन पाहाण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली. मग त्या दिवशीं, त्या तिघांनाही संध्याकाळीं खावयाला घालून जवाहर जेव्हां पुस्तक वाचण्यामध्यें गढून गेला, तेव्हां चंचल दाराच्या मागें लपून बसला. रोजच्या प्रमाणें कांहीं वेळानें जेलर हजिरी घेण्याकरतां आला व त्यानें कोठडीचें दार उघडलें. ही संधी साधून चंचल कोठडीबाहेर निसटला व बाहेर अंगणांत पळून गेला. नंतर तुरुंगाभोंवतीं असलेल्या उंच भिंतीमध्यें त्याला एका ठिकाणीं एक भोंक दिसलें. त्यांत घुसून तो त्या भिंतीच्या दुसऱ्या बाजूला बाहेर पडला. अशा रीतीनें तुरुंगांतून निसटल्यावर तो या रस्त्या-वरून त्या रस्त्यावर व या गल्लींतून त्या गल्लींत, असा मोकाट भटकूं लागला. आजूबाजूला जिकडे तिकडे नवीन गोष्टी दिसूं लागून त्याला या भटकण्याची फारच गंमत वाटूं लागली.

पण बऱ्याच वेळानें जेव्हां त्यानें परत आपल्या घरीं जावें, असें ठरवलें तेव्हां त्याला घरची वाट सांपडेना सर्वच रस्ते त्याला एकसारखे वाटूं लागले. बिचारा चंचल ! चहूंकडे

दाट काळोख पसरला होता व कडाक्याची थंडी पडूं लागली होती. तुरुंगांतल्या आपल्या उबदार बिछान्याची आठवण होऊन त्याला आतां रडूं कोसळलें. " कोणीतरी मला घरची




वाट दाखवाहो ! अयाईऽऽ ! आतां माझं कसं होईल ! कसं मला घर सांपडेल !" असें तो डोळ्यांत पाणी आणून ज्याला त्याला विनवूं लागला. पण त्याच्या या केंविलवाण्या शब्दांकडे रस्त्यांतून जाणाऱ्यायेणाऱ्यांपैकीं कोणीही लक्ष्य देईना. उलट त्यांच्यापैकीं एका कोणीतरी अनोळखी माणसानें एक दगड उचलला व त्याच्यावर फेंकला. हा दगड पाठीवर लागतांच चंचल दुःखानें विव्हळूं लागला. तो मग कसाबसा सरपटत बाजूच्या एका खळग्यामध्यें गेला व रात्रभर थंडींत कुडकुडत व किंचाळत तेथें पडून राहिला.

शेवटीं जेव्हां उजाडलें, तेव्हां या खळग्यांतून बाहेर येऊन पुनः तुरुंग कुठें आहे, हें तो शोधूं लागला. या खेपेला त्याचा हा प्रयत्न वाया गेला नाहीं. लवकरच वाट हुंगत हुंगत तुरुंगाची उंच भिंत त्यानें गांठली आणि एकदां ही भिंत गांठल्यावर ज्या भोंकातून तो बाहेर निसटला होता, त्याच भोंकातून परत कोठडीमध्यें येणें त्याला कठिण गेलें नाहीं.



आदले दिवशीं संध्याकाळीं जेलर येऊन गेल्यावर जेव्हां चंचल कोठडींत कुठें दिसेना, तेव्हां सगळीकडे जवाहरनें त्याचा शोध केला. सकाळ झाल्यावर कोठडीचा कोनाकोंपरा पुनः त्यानें धुंडाळला. पण तो कुठेंच दिसेना. "विचारा चंचल सुरक्षित आहे, ना ?" अशी एक सारखी जवाहरला काळजी वाटूं लागली. त्यामुळें अशारीतीनें चंचल पुनः कोठडींत आलेला पाहातांच त्याला फार संतोष वाटला. आनंदाच्या भरांत त्याच्यावर रागावण्याची व किंवा त्याची कानउघाडणी करण्याचीही जवाहरला आठवण राहिली नाहीं. उलट चंचलला जवळ घेऊन त्याला त्यानें दूध प्यावयाला दिलें. पण सबंध रात्र थंडीमध्यें कुडकुडत गटारांत पडून राहावें लागल्यामुळें चंचलला सर्दी झाली होती व त्यामुळें तो आतां फारच आजारी पडला. त्याच्या या



दुखण्याची जवाहरला फार काळजी वाटूं लागली व तो त्याची फार मायेनें शुश्रुषा करूं लागला. अखेरीस चंचल पुनः बरा झाला व पूर्वीसारखेंच दिवसभर त्याचें नाचणें बागडणें आतां सुरूं झालें.

तुरुंगामध्यें जवाहरचे जसे बरेच मित्र होते, तसेच तेथें त्याला शत्रुही होते. हे शत्रु म्हणजे ढेंकूण, विंचू, डांस आणि साप. हे प्राणी पुनः पुनः त्याच्यावर चाल करून येत व त्याला सतावून सोडीत. त्या सर्वांशीं त्याची एकसारखी लढाई चाललेली असे.

एक दिवस जवाहरनें त्याचा एक जो शत्रू, बिष नांवाचा विंचू, त्याला पकडलें. इतर विंचवांना दहशत बसावी, म्हणून त्यानें या बिषच्या कमरेभोंवतीं एक दोरी बांधली व त्याला भिंतीवर टांगून ठेवलें. पण दिवसभर आपल्या अंगाला आळेविळखे देत व धडपड करीत राहून बिषनें आपली या दोरींतून सुटका करून घेतली व तो पसार झाला. हा बिष पुनः परत येऊन आपल्याला डसण्याचा प्रयत्न करतो कीं काय, हें जवाहर पुढें बरेच दिवस पाहात राहिला होता. पण सुदैवानें बिष जो एकदा पसार झाला तो कायमचाच.

२०५२३
बाल वाङ्मय
६८६


# १०. एक दुःखाचा दिवस

जवाहरनें जवळजवळ दीड वर्ष तुरुंगांत घालवल्यावर त्याची आई फारच आजारी पडली व तिची त्याला भेट घेतां यावी, म्हणून त्याची तुरुंगांतून मुक्तता करण्यांत आली.

जवाहरच्या आईला कांहीं दिवसांनीं आराम वाटूं लागला. या खेपेला जवाहर पांच महिने व तेरा दिवस तुरुंगाबाहेर राहिला. पण नंतर सरकारनें त्याला पुनः पकडलें व त्याचे स्वतंत्रतेचे सुखाचे दिवस संपले.

यानंतर कमलेचें दुखणें वाढलें व दिवसेंदिवस ती खंगत चालली. तिच्याजवळ राहातां यावें, म्हणून पुनः सरकारनें जवाहरला तुरुंगांतून सोडलें. जवाहर आतां दिवसरात्र कमलेची शुश्रूषा करूं लागला व हळूहळू तिची प्रकृति सुधारूं लागली. नंतर सरकारनें पुन्हां त्याला तुरुंगांत पाठवलें व तो जवळ नसल्यामुळें कमला दुःखीकष्टी होऊन पुनः आजारी पडली.

आपण राजकारणांत भाग घेणार नाहीं, असें जवाहरनें कबूल करावें, याबद्दल सरकारनें त्याचें मन वळवण्याचा यावेळीं प्रयत्न केला. अशी कबुली त्यानें दिली, तर त्याला आपल्या पत्नीजवळ राहाण्याकरतां मोकळें करूं, असें सरकार म्हणूं लागलें. ही गोष्ट जेव्हां कमलेला कळली, तेव्हां अशी कबुली त्यानें देऊं नये, तसें त्यानें करणें योग्य नाहीं, असें कमलेनें जवाहरला कळवलें. दिवसेंदिवस कमलेची प्रकृति अधिकाअधिक बिघडत चालली. तिनें भवाली या हवेच्या ठिकाणीं गेलें पाहिजे, असें डॉक्टर म्हणूं लागले. या भवालीच्याजवळ



असलेल्या आल्मोराच्या तुरुंगांत जवाहरला पाठवावें म्हणजे मधून मधून हॉस्पि-टलमध्यें जाऊन त्याला कमलेला भेटतां येईल, असें आतां सरकारनें ठरवलें. कमलेच्या जवळ राहाण्याची सवलत दिल्याबद्दल यावेळीं जवाहरला सरकारबद्दल कृतज्ञता वाटली.

अशा रीतीनें जवाहरला पुनः आपल्या त्या डोंगरांची सोबत लाभली. झाडांवर किलबिल करणारे पक्षी, मंद वाऱ्यावर नाचणारीं फुलें व शेवाळलेल्या तलावाच्या पाण्यावर तरंगणाऱ्या ढगांच्या छाया, यांकडे कितीही वेळ पाहात राहिलें, तरी त्याचा आतां त्याला कंटाळा येईनासा झाला. आणि या गोष्टींमुळेंच कमलेच्या दुखण्यामुळें त्याच्या मनाला वाटणारी चिंता त्याला आतां सहन करतां येऊं लागली. कारण


कमला केव्हां आपल्याला सोडून या जगांतून निघून जाईल, याचा नेम नाहीं, या विचारानें तो हताश होऊन जाई. या अशा चिंतेच्या दिवसांत मनाला विरंगुळा वाटावा, म्हणून त्यानें यावेळीं आपली जीवनकहाणी लिहावयाला सुरवात केली. ही आपली कहाणी कमलेला अर्पण करावी, असेंही त्यानें ठरवलें. कारण ज्या पुष्कळशा गोष्टी तिला सांगाव्या असें त्याला वाटे, त्या या पुस्तकामध्यें तिला वाचावयाला मिळाल्या असत्या. जवाहरचा बराचसा काळ तुरुंगांत गेला होता व तुरुंगांतून बाहेर आल्यावर देशकार्यामध्येंच त्याचा सर्व वेळ खर्च होई, त्यामुळें इतके दिवस तिला सांगावयाला न मिळालेली स्वत:संबंधीची सर्व हकीगत तो या पुस्तकाच्या रूपानें लिहून काढणार होता.

थोड्या दिवसांनीं डॉक्टरांचें असें म्हणणें पडलें कीं, कमलेनें दूरचा देश जो जर्मनी तेथें गेलें पाहिजे. कारण तेथले डॉक्टर अधिक निष्णात होते व तेथली हवाही फार निरोगी होती. त्याप्रमाणें कमला इंदिरेला बरोबर घेऊन युरोपच्या बोटीवर चढली व इकडे दु:खीकष्टी जवाहर एकटाच तुरुंगामध्यें दिवस कंठू लागला.

जवाहरच्या कोठडीनजिक पांच मैना राहात असत. त्या दिवसभर गात राहात व त्याची करमणूक करीत. पण कित्येकदां कमलेबद्दल वाटणाऱ्या चिंतेमध्यें त्याचें मन गुंतून राहिले कीं, या मैनांना खाणें द्यावयाला तो विसरे. त्या मग आपल्या घरट्यांतून खालीं येत व एकसारखा किलबिलाट करून त्याच्याकडून आपलें खाणें मागून घेत.

यानंतर जर्मनीमध्यें कमलेची स्थिति अधिकच वाईट झाली. एक दिवस अचानक

जवाहरला तुरुंगांतून सोडण्यांत आलें. कारण कमला मृत्यू-पंथाला लागली होती. जवाहर विमानानें जर्मनीला गेला. कमलेच्या प्रकृतीसंबंधीं काय बातमी येते, म्हणून आम्हां सर्वांचीं मनें त्यावेळीं चिंताग्रस्त होऊन गेलीं. कारण, तुला माहित आहे का, कुमकुम, कमलेनें आपला गोड स्वभाव, निःस्वार्थीपणा व वीरता, या आपल्या गुणांनीं सबंध देशाचें आपल्यावर कमालीचें प्रेम जडवून घेतलें होतें. एक दिवस कमलेच्या प्रकृतीमध्यें सुधारणा आहे, अशी बातमी येई व आमचीं अंतःकरणें आशेनें फुलून येत, पण लगेच दुसरे दिवशीं तिची स्थिति जास्त वाईट झाल्याचें कळे व मग आमचीं मनें भीतिग्रस्त होत. अखेरीस तो दुष्ट दिवस येऊन ठेपला. कमलेचें देहावसान झालें, अशी बातमी त्या दिवशीं आली. सबंध हिंदुस्थान देशाचा तो शोकाचा दिवस होता. त्या दिवशीं आपला देश एका स्त्रीरत्नाला मुकला !



१९३६ मध्यें जवाहर एकटाच हिंदुस्थानला परत आला. आपली मुलगी इंदिरा हिला इंग्लंडमधल्या एका विद्यालयामध्यें ठेवून तो आला होता. यापुढें कमला हयात नसल्यामुळें

त्यानें आपलें तनमन आतां सर्वस्वी देशकार्याला वाहिलें व तेणेंकरून आपल्या जीवनामधला सुनेपणा भरून काढण्याचा तो प्रयत्न करूं लागला.

त्या वर्षीं लोकांनीं त्याला पुनः काँग्रेसचा अध्यक्ष निवडलें.

यानंतर लवकरच ब्रिटिशांनीं सबंध हिंदुस्थानांत निवडणुका भरवण्याचें ठरवलें. या निवडणुकांमध्यें जे लोक निवडून येतील, त्या हिंदी लोकांच्या हातीं, आपल्या देशाचे कायदे करण्याचा व राज्यकारभार चालवण्याचा अधिकार सरकार देणार होतें. जवाहरनें या निवडणुकांसाठीं फार परिश्रम केले व बहुतेक सर्व ठिकाणीं काँग्रेसचे लोक निवडून आले. अकरा प्रांतांपैकी सात प्रांतांमध्यें आतां काँग्रेसचा राज्यकारभार सुरूं झाला. काँग्रेसचा हा विजय म्हणजे आपल्या परिश्रमांचें आपल्याला मिळालेलें पारितोषक, असें समजून जवाहर फार आनंदित झाला.

पण लवकरच आणखी एक दुःख त्याच्यावर ओढवणार होतें. १९३८ मध्यें त्याची आई 'आनंद–भवन'मध्यें मृत्यू पावली. तिच्या शेवटच्या घटकेला तिच्या रुग्णशय्येजवळ असलेल्या जवाहरच्या तोंडून या प्रसंगीं दुःखोद्गार निघाले, "ही माझी आईहि मला सोडून गेली!" त्याला सोडून गेलेल्या त्याच्या जिवलग माणसांसंबंधींच्या स्मृतींची आठवण करून देणारें, 'आनंद–भवन' हें एक आतां सुनें घर झालें व तें अगदीं शून्यवत्, भयाण भासूं लागलें! जेव्हां जेव्हां दिवसभर काम केल्यावर थकूनभागून तो घरीं परते, तेव्हां तेव्हां, ज्याकाळीं त्याचे वडील, आई व कमला हीं हयात होतीं व त्याच्या दोघी बहीणी

विजयालक्ष्मी व कृष्णा यांचें लग्न झालें नव्हतें, तो सुखाचा काळ त्याला आठवे. त्या सर्वां-समवेत एकत्र घालवलेले किती ते सुखाचे दिवस!

पण हरि अजून होता. हा हरि कोण, हें माहित आहे का, तुला कुमकुम? तो एक इमानी, स्वामीभक्त नोकर होता. नेहरूंच्या कुटुंबांत त्याचीं कितीतरी वर्षें गेलीं होतीं व त्या कुटुंबांतल्या माणसांपैकींच एक असें त्याला मानलें जाई. त्याला विचारल्याशिवाय नेहरू मंडळी कुठलीही महत्त्वाची बाब ठरवीत नसत. त्यांनीं ठरवलेली एखादी गोष्ट त्याला पसंत नसली, तर तसें तो चक्क सांगून टाकी. जवाहर, विजयालक्ष्मी व कृष्णा, यांच्याविषयीं म्हणाल, तर हीं तिघेंही जरी आतां वयांत आलीं होतीं, तरी तो त्यांना लहान मुलांप्रमाणेंच वागवी. आणि आतां जवाहर एकटा पडल्यावर तर, हा हरि क्षणभरही त्याला विसंबत नसे व आईनें आपल्या लेंकराची काळजी घ्यावी, तशी तो जवाहरची काळजी घेई. जवाहर एक दिवस जेवला नाहीं, कमी जेवला किंवा त्यानें जास्त काम केलें, तर तो लगेच त्याची कानउघाडणी करी. जेव्हां जेव्हां जवाहरला फुरसत मिळे, तेव्हां तेव्हां तो व हरि गतकाळच्या गोष्टींविषयीं एकत्र बोलत बसत व मग हरीचे डोळे पाण्यानें भरून येत!

"अहाहा! ते किती छान दिवस होते! तसले दिवस पुनः पाहावयाला मिळणार नाहींत!" हरीच्या तोंडून मग उद्गार निघत.

# ११. कठीण दिवस


याच सुमारास, कुमकुम, जगांत एक नवें संकट उद्भवलें व त्यामुळें जगाच्या शांततेस धोका निर्माण झाला. हें संकट म्हणजे हुकुमशहांचा होत असलेला विजय. इटली, जर्मनी, रशिया व स्पेन या देशांवर हे हुकूमशहा सत्ता चालवीत होते. सत्तेकरतां हपापलेली व आपल्या स्वार्थाकरतां लोकांवर हुकमत चालवणारीं लोभी माणसें म्हणजे हे हुकूमशहा. स्वतःचें रक्षण करण्याइतकें ज्यांच्यामध्यें सामर्थ्य नाहीं, अशा दुर्बळ लोकांना हे हुकूमशहा पिळून काढतात व दुसऱ्यांचें जें कांहीं हाताला सांपडेल, तें बळकावून बसतात. अशा या गुंडांबद्दल जवाहरला नेहमीच तिरस्कार वाटे. एकदां कमलेच्या मृत्यूनंतर जवाहर इटलीमध्यें असतांना त्या देशामधला हुकूमशहा जो मुसोलिनी, त्याला जवाहरची भेट घ्यावीशी वाटली. पण जवाहरनें त्या गोष्टीला साफ नकार दिला; त्याच्याशीं नुसतें हस्तांदोलन करावयाला सुद्धां जवाहर तयार नव्हता.

१९३८ सालीं जवाहर पुनः युरोपला गेला व अद्भुतरम्य अशा स्पेन देशाला त्यानें भेट दिली. स्पेन देश त्यावेळीं यादवीं युद्धानें दुभंग झाला होता. कारण त्या देशामधल्या फ्रांको नांवाच्या एका सेनापतीनें तेथल्या लोकशाही सरकार विरुद्ध युद्ध पुकारलें होतें व निर्दयपणें लोकांवर बॉंबफेंक करून व त्यांचे बळी घेऊन त्यांच्यावर त्यानें आपल्या जुलमी सत्तेचें जोखड लादलें होतें.

या दिवसांत स्पॅनिश लोकांचे चाललेले हे हाल पाहून हुकूमशहांबद्दल मूळचाच तिटकारा असलेल्या जवाहरला फार खेद वाटला. स्पेन मधून परत आल्यावर हिंदुस्थानांतून अन्नसामुग्री पाठवून त्यानें स्पेन मधल्या या गांजलेल्या लोकांना मदत करण्याचा प्रयत्न केला.

जेव्हां जपाननें चीनकडून बळजबरीनें मांचूरिया प्रांत हिसकावून घेतला, इटलीनें अबिसीनिया देश बळकावला व जर्मन हुकूमशहा जो हिटलर त्यानें झेकोस्लोव्होकिया सारख्या एका लहान, दुर्बळ देशाचा एक भाग गिळंकृत केला, तेव्हां जवाहरनें या हुकूमशहांपुढें नमतें घेऊं नका, असा जगांतल्या लोकांना इषारा दिला. त्याला अशी आशा वाटत होती कीं, ब्रिटन व इतर स्वतंत्र राष्ट्रें या हुकूमशहांविरुद्ध लढून त्यांचा नायनाट करतील. पण या राष्ट्रांनीं त्यावेळीं असें कांहीं न केल्यामुळें जवाहरची निराशा झाली.

जवाहरनें आतां पुरातन काळापासूनचा हिंदुस्थानचा भातृदेश जो चीन, त्या देशाला भेट देण्याचें ठरवलें. चिनी लोक कित्येक वर्षांपासून त्यांचा थोर नेता चियांगकैशेक याच्या पुढारीपणा खालीं चीनमध्यें घुसलेल्या जपानी सैन्याला हांकलून देण्याकरितां शौर्यानें लढत राहिले होते. त्या लोकांचें धैर्य व त्याग, या गुणांचा जवाहरच्या मनावर फार परिणाम झाला होता व चीनच्या या उदाहरणामुळें आपल्या देशाच्या भविष्यकाळाबद्दलही त्याला आशा वाटूं लागली होती. कारण चीन व हिंदुस्थान हे दोन्ही देश एकसारखे आहेत व जर चीनला त्या देशांत घुसलेल्या परकी राष्ट्राचा प्रतिकार करतां येतो, तर हिंदुस्थानलाही आपलें गेलेलें स्वातंत्र्य मिळवणें कठीण नाहीं, असा विचार त्याच्या मनांत घोळूं लागे.



जवाहर चीनला जाऊन आल्यावर चियांगकैशेक व त्याची पत्नी यांनीही हिंदुस्थान देशाला भेट दिली व त्यावेळीं काँग्रेसच्या इतर पुढाऱ्यांशीं त्यांची येथें मुलाखत झाली. या गोष्टीमुळें हिंदुस्थान व चीन या देशांमध्यें एक दाट स्नेहाचें नातें निर्माण झालें.

जवाहर चीनमधून हिंदुस्थानांत परत यावयाच्या अगोदरच युरोपमध्यें युद्ध सुरूं झालें. हिटलरचें झेकोस्लोव्होकिया पादाक्रांत करून समाधान झालें नव्हतें; त्याला पोलंड देशही घ्यावयाचा होता. त्यानें व इतर हुकूमशाहांनीं आतां एकजूट केली व दुर्बळ देशांवर ते सगळीकडे चाल करून जाऊं लागले व जें मिळेल, तें बळकावूं लागले. ब्रिटन, फ्रान्स व अमेरिका या राष्ट्रांनीं आतां या हुकूमशहांविरुद्ध लढण्याचें ठरवलें. अशा रीतीनें हें जें युद्ध सुरूं झालें, त्याला दुसरें जागतिक युद्ध असें नांव मिळालें. सगळीकडे लोक एकमेकांना ठार मारूं लागले व या पृथ्वीवरील सारी मानवजातच द्वेषभावानें वेडी झाली आहे कीं काय व आपसांत लढून ती आतां नाश पावणार आहे कीं काय असें वाटूं लागलें.

याच दिवसांत अशी एक गोष्ट घडून आली कीं, त्यामुळें आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीला अधिकच जोर चढला. हिंदुस्थान देशसुद्धां या युद्धांत सामील झाला आहे, असें ब्रिटिशांनीं जाहीर केलें. काँग्रेसच्या लोकांना हें पसंत पडलें नाहीं. या युद्धामध्यें ब्रिटिशांची बाजू जरी न्यायाची होती, तरी हिंदुस्थाननें ब्रिटिशांना मदत करण्याकरतां या युद्धांत भाग घ्यावयाचा असल्यास प्रथम या देशाला ब्रिटिशांनीं स्वातंत्र्य देण्याचें कबूल केलें पाहिजे. तसें त्यांनीं न केल्यास स्वतःच पारतंत्र्यांत असलेल्या हिंदुस्थानसारख्या देशाला इतर देशांना

पारतंत्र्यांतून मुक्त करण्याकरतां या युद्धांत भाग घेणें शक्य नाहीं, असें कॉंग्रेसचें यावेळीं म्हणणें पडलें. जुलूम व गुंडपणा या गोष्टींचा अत्यंत तिरस्कार असलेल्या जवाहरला हिंदुस्थाननें ब्रिटिशांना या युद्धामध्यें मदत करावी, असें वाटत होतें. पण याबाबतींत कॉंग्रेसमधल्या इतर लोकांची त्याला समजूत पाडतां येईना. या लोकांची जी प्रांतिक सरकारें स्थापन झालीं होतीं, तीं सोडण्याकरतां राजिनामे दिले व एकामागोमाग एक, कायदेभंग करून त्यांनीं तुरुंगवास पत्करला.

कॉंग्रेसमधल्या लोकांच्या या निर्णयाला जवाहरनें मग मान्यता दिली व देशभर दौरा काढून नवीन सुरुं होणार असलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याला तयार राहा, असें तो लोकांना सांगू लागला. त्यामुळें सरकारनें त्याला पकडलें व एका वर्षाची सजा दिली.

एक वर्षानंतर जेव्हां जवाहर तुरुंगांतून सुटला, तेव्हां आपल्या देशाची परिस्थिति अधिकच वाईट झाली होती. पूर्वेकडे जपानी सैन्यानें ब्रह्मदेश पादाक्रांत केला होता व तें सैन्य हिंदुस्थानच्या सरहद्दीवर येऊन पोहोंचलें होतें. त्यामुळें आपल्या देशाला एक मोठाच धोका निर्माण झाला होता.

ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतून निघून जावें, म्हणजे त्यांच्याशीं मग एकजूट करून हिंदी लोकांना युद्धांत सामील होतां येईल, असें गांधीजी यावेळीं म्हणूं लागले. "हिंदुस्थान सोडा!" ही गांधीजींची घोषणा आतां लोकांनीं उचलली व देशांत सगळीकडे, "तुम्ही

या देशांतून निघून जा, नाहीं तर शत्रूसैन्याबरोबर लढणें आम्हांला शक्य होणार नाहीं." असें सरकारला लोक सांगू लागले.

१९४२ च्या ऑगष्ट महिन्यांतील ८ तारीख, या इतिहास प्रसिद्ध दिवशीं आपल्या पुढाऱ्यांनीं मुंबईला एक बैठक भरवून पुनः आणखी एक शांततामय लढा सुरू करण्याचें ठरवलें. पण त्यांच्याकडून कुठल्याही गोष्टीला सुरवात होण्यापूर्वींच सरकारनें ९ तारखेस पहांटेला या पुढाऱ्यांना पकडलें व तुरुंगांत पाठवलें.

पहांटेला पांच वाजतां पोलीस जवाहरला अटक करण्याकरतां आले. तो मुंबईला आपली बहीण कृष्णा हिच्या घरीं राहिला होता. इंदिराही या ठिकाणीं त्याच्याबरोबर होती. जवाहरनें आपल्या मुलीचा व बहीणीचा निरोप घेतला. त्यांना आतां आपण पुन: केव्हां भेटणार कोण जाणे, अशा विचारानें त्याचें मन यावेळीं खिन्न झालें होतें.

पुढाऱ्यांना सरकारनें पुन: पकडलें, हें पाहातांच लोकांनीं सरकारविरुद्ध बंड पुकारलें. शांततामय चळवळीचा गांधीजींचा संदेश ते विसरून गेले. सरकारी माणसें व पोलीस यांच्यावर त्यांनी हल्ले सुरू केले व या कामीं जेथें त्यांना यश आलें, तेथें तेथें त्यांनीं लोकराज्यें स्थापन केलीं.

देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत हें बंड पसरत चाललें असतांना सरकारनें जवाहरला अहमदनगरच्या तुरुंगांत व गांधीजीना पुण्याला अटकेंत ठेवलें होतें.

बाहेर लोकांकडून घडत असलेल्या गोष्टी व लोकांचें बंड मोडून काढण्याकरतां सरकारनें

योजलेले उपाय, यांची बातमी गांधीजींच्या कानांवर जातांच त्यांनीं आतां एकवीस दिवसांचा उपवास सुरू केला.

गांधीजींबद्दलच्या काळजीनें देशांतल्या सर्व लोकांचें मन यावेळीं कासावीस होत होतें. कारण या त्यांच्या उपवासाचा जसजसा एक एक दिवस जाऊं लागला, तसतसे ते अधिकाधिक क्षीण होत चालले व शेवटीं तर बिछान्यावर उठून बसतांसुद्धां येत नाही, अशी त्यांची स्थिति झाली. यानंतर ते जगतील अशी आशाही लोकांना वाटेना! अखेरीस हे एकवीस दिवस संपले. गांधीजी म्हणजें नुसते हाडामांसाचा सांपळा बनले होते. पण ते जगले.

खरोखर! गांधीजींनीं ज्या दिवशीं अन्नग्रहण केलें, त्या दिवशीं, कुमकुम, लोकांना झालेला काय तो हर्ष! त्यांचे प्राण सुरक्षित ठेवल्याबद्दल सबंध देशानें त्या दिवशीं ईश्वराची प्रार्थना केली व त्याचे आभार मानले!

# १२. अहमदनगरची एक बाग

या दिवसांत जवाहरला अहमदनगरच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें होतें. एका मोठ्या किल्ल्यामध्यें हा तुरुंग होता. या किल्यावर जुन्या काळीं अनेक लढाया झाल्या होत्या. चांदबिबी नांवाची एक शूर व नेकजात राणी या किल्ल्याचें रक्षण करण्याकरतां एकदां मोठ्या मर्दुमकीनें लढली होती.

चांदबिबीची हकीगत जवाहरच्या वाचण्यांत आली होती व तिच्याविषयीं त्याला फार आदर वाटे. त्यामुळें हा जुना किल्लाही त्याला आवडूं लागला. त्याच्याबरोबर कॉंग्रेसचे आणखी बरेच पुढारी याच किल्ल्यांत अटकेंत होते. त्यांच्यापैकीं दोन फार मोठ्या व्यक्ति म्हणजे गुजराथचे सरदार म्हणून प्रख्यात असलेले वल्लभभाई पटेल व त्यावेळचे कॉंग्रेसचे अध्यक्ष, मौलाना अबुल कलाम आझाद, या होत.

या तुरुंगामध्यें अकरा खोल्या होत्या. त्यांतल्या दहा खोल्यांमध्यें हे कैदी राहात असत व अकरावी खोली जेवणघर व सर्वांच्या बैठकीची जागा म्हणून वापरली जाई. संध्याकाळच्या वेळीं ते येथें एकत्र जमत व कॉफी पितां पितां निरनिराळ्या विषयांवर बोलत बसत. अशा प्रसंगीं जवाहर बराच वेळ बोलत राही. कारण त्याचें बोलणें इतकें चटकदार असे कीं, इतरांना तें ऐकत राहावेंसें वाटे. आठवड्यांतून एका ठराविक दिवशीं जवाहर त्या


सर्वांकरतां चिनी पद्धतीचा चहा तयार करी आणि मग त्या दिवशीं त्यांच्या संभाषणाला विशेष खुमारी येई.

या तुरुंगांतलें जेवण अतिशय वाईट असे. त्यांत सुधारणा म्हणून हे कैदी कांहीं पदार्थ स्वत: पकवीत. पण स्वयंपाकाचें काम जवाहरला जमत नसे. त्यामुळें शिजवलेलीं अंडीं हा एकच पदार्थ तो तयार करी; कारण ती फार सोपी गोष्ट होती.

दिवाळी, रमझान, दसरा व असेच इतर सण आले कीं, त्या दिवशीं जवाहर व त्याचे सोबती विशेष चांगलें जेवण तयार करीत. पण त्यांच्याकडून साजरा होणारा वर्षांतला फार मोठा दिवस म्हणजे २६ जानेवारीचा स्वातंत्र्यदिन. या दिवशीं जेवणघर फुलांनीं व राष्ट्रीय निशाणांनीं सुशोभित केलें जाई. मग संध्याकाळीं त्या सर्वांची येथें बैठक भरे व त्यावेळीं त्यांचीं आवेशयुक्त व हृदयस्पर्शी अशीं भाषणें होत. या भाषणांच्या शेवटीं ते सर्वजण उभे राहून आपलें राष्ट्रगीत गात. मातृभूमीला अभिवादन करणाऱ्या या आपल्या शूर पुढाऱ्यांचे आवाज यावेळीं त्या तुरुंगाच्या भिंतीमध्यें दुमदुमूं लागत. ज्या दिवसाचें अहमद-नगरला कोणालाही विस्मरण होत नसे, असा आणखी एक दिवस म्हणजे जवाहरचा वाढदिवस. हा दिवसहि ते आनंदानें घालवीत.

या तुरुंगाला एक प्रशस्त अंगण होतें. जेथें पूर्वीं नुसतें एकच झाड होतें, अशा या अंगणामध्यें जवाहरनें लवकरच एक सुंदर बाग तयार केली. रोज या बागेमध्यें जमीन खणणें, फुलझाडांना पाणी घालणें, अशीं कामें तो करी. कित्येकदां येथें जमीन खणीत असतां त्याला,


ज्यांवर कोरींव काम केलें आहे, असे दगड सांपडत. चांदबिबीच्या काळीं येथें जो किल्ला होता, त्याचे हे दगड म्हणजे एक भाग असला पाहिजे. ज्यावेळीं जवाहर बागेंत काम करीत नसे, त्यावेळीं त्याचें वाचन चाललेलें असे. या तुरुंगांतील सर्व कैद्यांमध्यें जर कोणाकडे सर्वांत मोठा पुस्तकसंग्रह असेल, तर तो जवाहरकडे. दिवसांतून बराचसा त्याचा वेळ हीं पुस्तकें वाचण्यांत जाई. हिंदुस्थानचा उज्ज्वल भूतकाळ व तेव्हांचें या देशाचें वैभव व कीर्ति, यांची त्याला या पुस्तकांमध्यें माहिती मिळे. जो वाचून इतरांना हिंदुस्थानसंबंधीं अधिक ज्ञान होईल, असा एक आपण ग्रंथ लिहावा, असा विचार आतां जवाहरच्या मनांत आला. या पुस्तकाला 'हिंदुस्थानची कहाणी' असें त्यानें नांव दिलें. मधून मधून तो चरख्यावर सूतहि काढी. बऱ्याच महिन्यांनंतर त्यानें काढलेलें हें सूत एक साडी विणण्याला पुरेसें होईल, एवढें भरल्यावर तें एकत्र करून काळजीपूर्वक स्वत:जवळ त्यानें ठेवून दिलें. तुरुंगांतून सुटल्यावर या सुताची इंदिरेकरतां एक साडी तयार करून द्यावयाची, असें त्यानें ठरवलें होतें.



१९४५ मध्यें जवाहर व आणखी कांहीं पुढारी यांना अहमदनगरमधून आलमोराच्या तुरुंगामध्यें हलवण्यांत आलें.

तुला आठवत असेल, कुमकुम, कमलेचा मृत्यू घडून आला, तेव्हां थोडे दिवस आधीं जवाहरला कैदी म्हणून याच तुरुंगांत ठेवलें होतें. डोंगर, वृक्ष, फुलें आणि दिवसभर त्याच्यासाठीं गाणारे शेंकडों, पक्षी, या आपल्या पूर्वीच्या सोबत्यांची संगत त्याला आतां पुन: लाभली.

या तुरुंगाभोंवतालीं असलेल्या उंच वृक्षांवर वानरांची एक टोळी राहत असे. हे वानर फारच खट्याळ व खेळकर असे होते. त्यांचा सर्व दिवस या फांदीवरून त्या फांदीवर हेलकावे घेण्यांत व चीं चीं अशी आरडाओरड करण्यांत जाई. या झाडावरून त्या झाडावर उड्या मारणाऱ्या या वानरांकडे जवाहर गमतीनें पाहात राही व मग त्याला वाटे, या वानरांबरोबर आपल्यालाही अशा उड्या मारीत मजेंत वेळ घालवतां आला असता, तर किती बरें झालें असतें ! इतर कैद्यांनाही या वानरांकडे पाहात राहाण्यांत मोठी गंमत वाटे. एकदां जवाहर आपल्या कोठडीमध्यें वाचीत बसला असतांना, बाहेर अंगणांत एकाएकीं सुरूं झालेली कोणाची तरी आरडाओरड त्याच्या कानांवर आली व हा काय प्रकार आहे, तो पाहावा, म्हणून तो बाहेर गेला. पाहातो तों, बरेचसे कैदी झाडावरून खालीं पडलेल्या एका वानराच्या बच्चाभोंवतीं जमा झाले होते व त्याच्या गळ्याभोंवतीं एक दोरी बांधून अंगणांत एकसारखे त्याला फिरवीत होते. तो बच्चा बिचारा घाबरून जाऊन



बारीक पण उंच स्वरांत आपल्या आईकरतां किंचाळत होता. या बच्चाची आई व बाप, हीं यावेळीं उंच झाडावरून चिंताग्रस्त मुद्रेनें हें सर्व बारकाईनें न्याहाळीत आपल्या पिलाला सोडवून आणण्याच्या संधीची वाट पाहात होतीं. अखेरीस त्या बच्चाच्या बापानें झाडावरून अचानक तुरुंगाभोंवतालच्या उंच भिंतीवर उडी घेतली व तेथून त्यानें अंगण गांठलें. हळूहळू एक एक पाऊल पुढें टाकीत तो कैद्यांच्या जमावाजवळ येऊं लागला. त्याच्या नजरेमध्यें यावेळीं इतका क्रूरपणा दिसून येत होता कीं, तो पाहिल्यावर कैदी भ्याले व हातांतल्या काठ्या टाकून देऊन दूर पळून गेले. त्या वानरानें मग त्या आपल्या बच्चाला आपल्या पोटाखालीं घट्ट कवटाळलें व त्याला सुरक्षित त्याच्या आईजवळ नेऊन पोहोंचवलें.

आपल्या बच्चाला सोडवण्याकरतां या वानरानें दाखवलेला हा मर्दपणा खरोखरच वाखाणण्यासारखा होता.

# १३. ‘ चलो दिल्ली ’

१९४५ सालीं पश्चिमेकडील युद्ध संपलें व त्या वर्षीं जून महिन्यांत सरकारनें आपल्या पुढाऱ्यांना तुरुंगांतून सोडून, या देशांतील लोकांनीं येथें स्वतःचें सरकार कसें स्थापावें, या गोष्टीचा विचार करण्याकरतां, त्यांना सिमला हें जें हवाफेर करण्याचें डोंगरी ठिकाण आहे, तेथें बोलावलें.

इतर निरनिराळ्या पक्षांतील लोकांनासुद्धां सरकारनें यावेळीं सिमल्याला बोलावलें. या लोकांमध्यें ज्यांनीं मुस्लीमलीग नांवाचा स्वतःचा एक पक्ष स्थापन केला होता, असे मुसलमानांचे पुढारी होते.

सिमल्याला भरलेल्या या पुढाऱ्यांच्या बैठकीमध्यें चर्चा व वाटाघाटी हीं बरीच झालीं. पण काँग्रेस व मुस्लीमलीग यांचें एकमत होईना. कारण काँग्रेसला हा हिंदुस्थान देश त्यावेळीं होता, तसा अखंड ठेवायचा होता, तर मुस्लीमलीगला त्याचे दोन भाग केलेले व त्यांतील एका भागामध्यें निराळें मुसलमानी राज्य झालेलें हवें होतें. अखेरीस या वाटाघाटींतून कांहींहि निष्पन्न झालें नाहीं.

काँग्रेसच्या ज्या लोकांना बैठकीला बोलावलें होतें, त्यांमध्यें जवाहर होता. ही बैठक संपतांच तो बर्फाच्या शिरोभूषणानें नटलेल्या डोंगरांचा प्रदेश जो काश्मीर, तेथें गेला. त्याला तुरुंगांत घालवाव्या लागलेल्या या दीर्घकाळामध्यें केव्हां एकदां काश्मीरला जाईन

अशी त्याला उत्कंठा लागून राहिली होती. ती पुरी होऊन जवाहरला आतां राजकारण बाजूला ठेवतां आलें व निश्चिंतपणानें व आनंदानें कांहीं दिवस काश्मीरमध्यें घालवतां आले.

पण १९४५ मध्यें तुरुंगांतून सुटून आलेला जवाहर आतां पूर्वीचा जवाहर राहिला नव्हता. त्याच्या मनोवृत्तीमध्यें थोडासा बदल घडून आला होता. तुला माहीतच आहे, कुमकुम, जगांतले सर्व लोक स्वतंत्र असले पाहिजेत व बलिष्ठांकडून होणाऱ्या अन्यायापासून जे दुर्बल असतील, त्यांचे संरक्षण झालें पाहिजे, असें जवाहरचें पूर्वीपासूनचें मत होतें. म्हणून जे हुकूमशहा दुर्बल राष्ट्रांना चिरडून टाकीत होते, त्यांचा नायनाट करण्याकरतां हिंदुस्थाननें दुसऱ्या जागतिक महायुद्धामध्यें भाग घ्यावा, असें तें महायुद्ध सुरू झालें, त्यावेळीं त्याला वाटत होतें. पण हें महायुद्ध चालू असतांना कितीतरी वर्षं त्याला तुरुंगांत घालवावीं लागलीं व जगाच्या स्वातंत्र्याकरतां चाललेल्या या लढ्याला त्याला मदत करतां आली नाहीं. या गोष्टीमुळें त्याच्या मनोवृत्तीमध्यें कडवटपणा निर्माण झाला. सर्व काळ जगांतील इतर, देशांच्या स्वातंत्र्याकरतां तळमळत राहाण्याइतका आपला ध्येयवाद उच्च राखणें, हें शहाणपणाचें आहे कीं काय असें त्याला वाटूं लागलें. यापुढें हिंदुस्थानचें हित कशानें होईल, हें आधीं पाहाण्याचा थोडासा जास्त व्यावहारिकपणा आपण दाखवला पाहिजे, असें त्यानें आतां ठरवलें.

अखेरीस पूर्वेकडील युद्धही थांबलें.

हिंदुस्थानामध्यें फार मोठ्या निवडणुका भरवण्याचें ब्रिटिशांनीं यावेळीं ठरवलें.

निवडणुकांच्या या धामधुमीमध्येंही जवाहरनें आपल्या नेहमीच्या वृत्तीप्रमाणें फार मेहनत घेतली. इंडियन नॅशनल आर्मीच्या ‘ चलो दिल्ली ! ’ या घोषणेचा अवलंब करून कॉंग्रेस या खेपेलाही विजयी झाली. अशा रीतीनें बऱ्याचशा प्रांतांमध्यें कॉंग्रेसचीं प्रधानमंडळें आतां राज्यकारभार चालवूं लागलीं.

इंग्लंडमध्येंही निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्यें गरीब जनता व मजूरवर्ग यांचे पुढारी तेथें निवडून आले. हिंदुस्थान व इंग्लंड या देशांमध्यें कायमचा स्नेहभाव निर्माण करावयाचा असल्यास हिंदुस्थान देशाला स्वातंत्र्य मिळून त्या देशाची भरभराट होणें अवश्य आहे, असें या पुढाऱ्यांना वाटूं लागलें. म्हणून त्यांनीं हिंदुस्थानांतील सर्व पक्षांतील पुढाऱ्यांची दिल्लीला एक बैठक बोलावली व स्वतंत्र हिंदुस्थानला कशा प्रकारचें सरकार स्थापावयाचें आहे, हें या बैठकीमध्यें ठरवण्याचें काम या हिंदी पुढाऱ्यांकडे सोंपवलें.

आणि हें सर्व चाललें असतांना, इंग्लंडमध्यें अधिकारावर आलेल्या नवीन सरकारनें दिल्लीच्या व्हाइसरॉयला या देशाचा राज्यकारभार चालवण्यामध्यें येथल्या पुढाऱ्यांनीं मदत करावी, असें या पुढाऱ्यांना सांगितलें. ब्रिटिशांनीं दाखवलेला हा सख्यभाव पाहून मुस्लीम लीग व कॉंग्रेस या दोन्ही पक्षांचे पुढारी व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्यें सामील झाले. आणि यावेळीं जवाहरला परराष्ट्रीय खात्याचा प्रमुख व या हंगामी सरकारचा उपाध्यक्ष करण्यांत आलें. ही तात्पुरती व्यवस्था १५ आगष्ट १९४७, या दिवशीं रद्द झाली व या संस्मरणीय दिवशीं दिल्ली राजधानी असलेलें हिंदुस्थान व कराची राजधानी असलेलें पाकिस्तान, अशीं दोन स्वतंत्र

वसाहतराज्यें येथें स्थापन करण्यांत येऊन या वसाहतराज्यांच्या सरकारकडे ब्रिटिशांनी या देशाचे सर्व अधिकार सुपूर्त केले.

हिंदुस्थानांतला शेवटचा ब्रिटिश व्हाइसरॉय, लॉर्ड माउंटबॅटन यानें येथल्या राज्यव्यवस्थेमध्यें हा मोठा बदल घडवून आणण्याच्या कामीं फार मदत केली होती. तोच लोकांच्या निमंत्रणामुळें हिंदुस्थानच्या वसाहतराज्याचा पहिला गव्हर्नर जनरल झाला व जवाहर पहिला पंतप्रधान झाला.

आणि त्याच पदावर जवाहर आज आहे. तो दिल्लीमध्यें राहतो व त्याची मुलगी इंदिरा हीसुद्धां त्याच्याकडे राहाते. पांच वर्षांमागें इंदिरेचें फीरोज गांधी यांच्याशीं लग्न झालें. ती आतां दोन मुलांची आई झाली आहे. तिचा थोरला मुलगा राजीव हा फारच खोडकर आहे. त्याचा सर्व वेळ उनाडण्यांत जातो. त्याच्यावर सर्वजण इतकें प्रेम करतात कीं, तो बराच लाडावलेला आहे. जवाहरचा या आपल्या छोट्या नातवावर फार जीव आहे. पण या राजीव बरोबर खेळावयाला आपल्या कामापुढें त्याला फुरसतच मिळत नाहीं.

कारण परक्यांची सत्ता नष्ट करून स्वातंत्र्य मिळवणें म्हणजे अर्धी लढाई जिंकण्या-सारखें आहे. स्वतःचा राज्यकारभार नीट रीतीनें चालवायला हा आपला देश समर्थ झाला पाहिजे. आणि ही गोष्ट सोपी नव्हे. त्यामुळें जवाहर आतां पूर्वींहूनहि अधिक मेहनत करीत असतो. कित्येकदां त्याला रात्री झोंप घ्यावयालाहि वेळ मिळत नाहीं. या अतिश्रमामुळें त्याच्या चेहऱ्यावर सुरकुत्या दिसूं लागल्या आहेत, आणि इंदिरेला तर, तो आजारी तर

नाहीं ना पडत, अशी नेहमी भीति वाटत असते. पण विश्रांति कशी ती जवाहरला माहीत नाहीं. कितीतरी कार्य अजून करावयाचें राहिलें आहे, त्याचाच त्याला एकसारखा ध्यास ! आणि आतां ही माझी गोष्ट, कुमकुम, पुरी व्हावयाला आली. पण तुझ्या पुस्तकांत सांगितलेल्या गोष्टींचा शेवट नेहमी ज्या प्रकारें होतो, त्या प्रकारें या गोष्टीचा शेवट जरी होत नसला, तरी ही गोष्ट कितीतरी अधिक नवलाईची व चित्ताकर्षक आहे. कारण ही एक खरी घडलेली गोष्ट असून या गोष्टीचा आपणां सर्वांशीं संबंध येतो. विशेषतः तुझ्याशीं व तुझ्या वयाच्या इतर सर्व मुलांशीं, कुमकुम, या गोष्टीचा जास्त संबंध पोंहोंचतो.

म्हणून ही गोष्ट कशी समाप्त व्हावी, हें तुझ्यावर व तुझ्यासारख्याच हिंदुस्थानांतील इतर मुलांवर अवलंबून आहे. आपण मिळवलेल्या या स्वातंत्र्याच्या दिवसांत आतां तुम्ही हिंदुस्थानची अशी नवी, सुरेख घडी बसवली पाहिजे कीं, या देशांतील प्रत्येक लहान मुलाला पोटभर अन्न मिळालें पाहिजे, अंगभर वस्त्र मिळालें पाहिजे, त्याला शाळेंत जातां आलें पाहिजे व त्याचें चांगल्या रीतीनें संगोपन झालें पाहिजे. एवढें तुम्हीं केलेंत, तर जन्मभर आपण केलेल्या कार्याचें चीज झालें, असें जवाहरला वाटूं लागेल. आणि एवढें घडून आल्यावरच माझ्या या गोष्टीचा शेवट म्हणून मला म्हणतां येईल—आणि आमच्या या गोष्टीचा नायक यापुढें सुखानें कालक्रमणा करूं लागला.

क्र. ... ग्रंथालय
अ. क्र. ५४८० ...
१०१
दि. ...

